छात्र

# प्रबोधन

वर्ष ५ अंक १

सौर श्रावण शके १९१८




ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक !

## ' निर्मितीचा आनंद व विक्रीचा अनुभव '

# राखी विक्री उपक्रम

कच्च्या मालापासून, सुट्या गोष्टींपासून आकर्षक रचना तयार करण्यातला आनंद काही वेगळाच असतो. तो मिळविण्यासाठी यावर्षी **राखी उपक्रमात सहभागी व्हा !** स्वत:ची कल्पनाशक्ती वापरून, आकर्षक, नावीन्यपूर्ण राख्या तयार करा. ५ राख्यांच्या कच्च्या मालाचे पाकीट ९ रुपयांना स्थानिक वा मुख्य कार्यालयामध्ये मिळू शकेल. त्याबरोबर राखी कशी तयार करावी याची कृती व काही नमुन्यांची नक्षी असलेला कागद दिला जाईल. तयार झालेल्या आकर्षक राख्या ओळखीच्या व अनोळखी व्यक्तींकडे जाऊन विका. अनेक नवनवीन अनुभव मिळतील. राखीची किंमत ठरवताना बाजाराचा फेरफटका मारून बाजारभावाचा अंदाज घ्या. त्यापेक्षा आपल्या राखीची किंमत कमी असेल व ती जास्त आकर्षक असेल असे पाहा.

विक्रीतून मिळालेला नफा एखादे पुस्तक, शैक्षणिक साहित्य आणण्यासाठी वापरा. स्वत:च्या कष्टातून खरेदी केलेली वस्तू जास्त काळ टिकते. शक्य झाल्यास संपूर्ण नफा अथवा नफ्यातील काही भाग गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यासाठी वापरा. उपकाराच्या भावनेतून नव्हे तर कर्तव्याच्या जाणीवेतून ! त्यातून मिळणारा अनंद दीर्घकाळ लक्षात राहील.

लवकरात लवकर कच्चा माल खरेदी करून आपल्या उद्योगाला लागा. तुम्हाला आलेले अनुभव आम्हाला जरुर कळवा !



## पत्रमैत्री करायची आहे का !

नवनवीन मित्र जमवायला तुम्हाला आवडतात ना ! वर्गातील मित्र तर आपल्या सर्वांनाच असतात. पण ज्यांना आपण पाहिले नाही अशा तुमच्याच वयाच्या, तुमच्यापासून दूर राहणाऱ्या प्रबोधकांशी तुम्हाला मैत्री करायला नक्कीच आवडेल, हो ना ? तर एक जोडकार्ड (पोस्टाचे) घ्या. त्यातील एका कार्डावर तुम्हाला कोणत्या गावातील कोणत्या इयत्तेतील मित्र हवे आहेत ते त्यावर लिहा. त्यावर आमचा पत्ता घाला. जोडकार्डाच्या दुसऱ्या कार्डावर तुमचा पत्ता घालून आमच्याकडे पाठवा. आम्ही तुम्हाला दोन प्रबोधकांचे पत्ते पाठवू त्यांच्याशी पत्रव्यवहार करून तुमची दोस्ती वाढवा. मुलामुलींनी या योजनेचा अवश्य लाभ घ्यावा.

ॐ

छात्र प्रबोधन

वर्ष ५ अंक १

सौर श्रावण शके १९१८

इवली शल्ये रुपती खुपती मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी ने ज्योतिर्जगतात

**संपादक प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc.B.Ed.
अनघा लवळेकर M.A.B.Ed.
शैलजा देशमुख M.A.M.Ed.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
भास्कर सगर

**अक्षर जुळणी**
प्रिंट लिंक, भांडारकर रोड
पुणे - ५.

**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे - २.

**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.
☎ ४७७६९१

**वार्षिक नोंदणी क्रमांक**
PHM/153/VIII

**प्रकाशन दिनांक**
सौर श्रावण ८ शके १९१८
३० जुलै १९९६

**वार्षिक वर्गणी** - रु. १००/-

## *या अंकात दडलंय काय?*

- **संवाद** २
- **बाळ गंगाधर टिळक ते लोकमान्य** ३
- **ओळख संगणकाशी** ८
- **कथा - वाळवी आणि दीप** ९
- **कृतिकौशल्य - मेंदी काढू या!** १३
- **कथा ऑलिंपिकची** १५
- **नमस्कार ऑगस्टपुत्रांनो** २१
- **डोळस भटकंती - सर्पसृष्टीची ओळख** २५
- **आई का उगाच रागावते** २८
- **वेगळी राखी पौर्णिमा** २९
- **कथा शोधकांच्या - बोलका पत्थर.... रोझेटा स्टोन** ३१
- **कविता पानोपानी** ३६
- **पाऊले चालती पंढरीची वाट....** ३९
- **रिमोट कंट्रोल कसे चालते?** ४२
- **स्वप्नपूर्तीकडे भरारी** ४३
- **संवाद भारतीय भाषांमध्ये** ४६
- **दिवाळी अंकासाठी..... विविध स्पर्धा** ४७
- **कार्यालयीन पत्ते** ४८

# संवाद

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

***'छात्र प्रबोधन' च्या पाचव्या वर्षात सर्व जुन्या-नव्या सभासदांचे मन:पूर्वक स्वागत!*** *वार्षिक वर्गणी भरून तुमचं काम संपलं नाही बरं.... खरं तर ते आता सुरू झालं आहे.* ***हे मासिक तुम्हाला आता स्वस्थ बसूच देणार नाही.*** *तुम्ही सतत काहीतरी धडपड करावी, नवीन गोष्टी करून बघाव्यात, प्रयोग करून, निरीक्षणे नोंदवून निष्कर्ष काढावेत, स्वत:ला जे येतं ते अनेकांना सांगावं; यासाठी या वर्षभरातील अंकांमधून विविधांगी लेख येणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रात ठिकठिकाणी तुमच्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांची योजनाही स्थानिक पालक-शिक्षकांच्या सहकार्याने होत आहेत. या सर्वांचा पुरेपूर उपयोग तुम्ही सर्वांनी करून घ्यायचा बरं का? त्यासाठी आठवड्यातून ३-४ तास वेळही काढायला हवा. तसं झालं तर खऱ्या अर्थानं तुमची अन् आमची मैत्री वाढणार! खऱ्या अर्थाने तुम्ही प्रबोधक होणार!!*

*श्रावण महिन्यातील राखीपौर्णिमा, नागपंचमी इ. सण-समारंभांचा मूळ हेतू लक्षात घेऊन नवीन काळाला अनुरूप असा काही बदल सुचवू शकाल का? त्याप्रमाणे प्रत्यक्ष करून बघता येईल का? जरा प्रयत्न तर करून बघा! कदाचित फसेल... कोणीतरी हसेल... पण कदाचित नवीन काही गवसेलही.... चुका करायला, अपयश पत्करायला जो घाबरतो तो कधीच नवीन काही करू शकत नाही.* ***प्रबोधनच्या प्रबोधकांना नवीन काही करून बघण्याचा हव्यास असायला हवा.***

*श्रावणाबरोबर ऑगस्ट मध्येही महत्त्वाचा राष्ट्रीय सण* ***१५ ऑगस्ट – भारताचा स्वातंत्र्य दिन*** *आपण साजरा करतो.* ***या राष्ट्रीय सणालाही आपण सर्वांनी मिळून महत्त्व प्राप्त करून देऊ या.*** *घरामध्ये, शाळेमध्ये, वस्तीमध्ये, सोसायटीमध्ये तो कसा साजरा केला जावा यावर विचार करा. राष्ट्रीय अभिमान, राष्ट्रीय परंपरांचा आदर, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्य मिळवून दिलेल्या हुतात्म्यांबद्दलची कृतज्ञता, स्वराज्याचे सुराज्य करण्याची अन् अखंड हिंदुस्थान बनविण्याची ऊर्मी हे सर्व आपल्या उपक्रमांमधून कसे वाढेल, या दिशेने विचार करायला लागलात तर तुम्हालाही खूप काही सुचेल, वेगळ्या प्रकारच्या स्पर्धा, नाटके, स्फूर्तिगीते असे अजूनही कितीतरी करता येईल. करून तर पाहा.*

*लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी, योगी अरविंदांचा जन्मदिन, प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा पेंडसे यांचा स्मरणदिन ऑगस्टमध्येच येतो. या थोर व्यक्तींच्या कार्याचे अन् विचारांचे स्मरण करू या.* ***'आपण त्यांच्या समान व्हावे....'*** *असा संकल्प करू या.*

*प्रबोधिनीचा वर्धापनदिनही ऑगस्टमध्येच येतो. ८ ऑगस्ट ९६ ला प्रबोधिनीला ३५वं वर्ष लागेल. या ३४ वर्षांमधल्या प्रबोधिनीच्या वाटचालीचा आढावा शेवटच्या पानावर थोडक्यात मांडला आहे.* ***ज्ञान प्रबोधिनीचे हे स्फुरण दशदिशांना नेण्यासाठी तुम्ही छोट्या-मोठ्या जबाबदाऱ्या उचलाल अन् त्या समर्थपणे पेलाल असा विश्वास बाळगून आहोत.***

*येत्या वर्षात पत्राद्वारा व प्रत्यक्ष भेटीतूनही आपण परस्परांमधला संवाद अन् मैत्री अधिक दृढ करूयात!*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

# बाळ गंगाधर टिळक ते लोकमान्य ...!

***डॉ. विश्वास मेहेंदळे***



*एक ऑगस्ट – लोकमान्य टिळकांचा स्मरणदिन! सर्वसामान्यांच्या हृदयीचा ठाव घेऊन तेथे घर करून राहाणं ही खूप अवघड गोष्ट आहे. आज ७५ वर्षांनी मागे वळून पाहताना, लोकामान्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा चढता, तळपता आलेख न्याहाळताना या मोठेपणाची बीजं नेमकी कोठे होती, त्यांचं वेगळेपण बालपणापासून कसं जाणवत होतं याचा वेध घेतला आहे डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी!*

कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिखलगावी जन्मलेल्या गंगाधरपंत टिळकांचा मुलगा बाळ हा 'लोकमान्य' या पदापर्यंत कसा पोहोचला, त्यासाठी त्यानं काय आणि कशा प्रकारचा प्रवास केला हे तुम्हांला सांगायचंय. या बाळाचे पाय पाळण्यातच दिसू लागले असणार यात शंका वाटत नाही.

२३ जुलै १८५६ रोजी टिळकांचा जन्म झाला. त्याक्षणीच ते मोठे होणार अशी काही कुणी भविष्यवाणी केलेली नव्हती. पण बाळाचे पाय खरोखरीच पाळण्यात दिसतात ही म्हण खरी असावी. 'नर करणी करे, तो नर का नारायण बन जाता है।' अशी जी एक दुसरी म्हण आहे, त्यानुसार हा खरोखरीच एक छोटासा 'नर' बाळ केवळ स्वकर्तुत्वानं मोठा झाला आहे, हे त्याच्या चरित्रावरून स्पष्टपणे जाणवतं. जनतेच्या, सर्वसामान्यांच्या हृदयीचा ठाव घेऊन, वर्षानुवर्ष, शिवाजीराजाप्रमाणं त्यांच्या हृदयात मानानं घर करून राहणं, ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. विशेषत: आजच्या या पूर्णपणानं कमशिर्यल दृष्टिकोन घेऊन जगणाऱ्या जगात तर खरोखरीच ही गोष्ट मोठी कर्मकठीण आहे. १९२० साली



*With Best Compliments From SUNIKEM ENTERPRISES, PUNE.*

मृत्यू पावलेल्या लोकमान्य टिळकांचं आज पंचाहत्तर वर्षानंतरही स्मरण होताना दिसतं आणि तेही शासनाच्या चाकोरीतून नव्हे, तर खरोखरीच त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आत्यंतिक जिव्हाळ्यामुळे! या ना त्या शक्कली लढवून वा क्लृप्त्या करून शासकीय मानसन्मान मिळवता येईल. पण जनसामान्यांच्या मनात मानाचं स्थान मिळवणं हे अवघड आहे. तेच या महापुरुषानं करून दाखविलं, हे त्यांचं मोठेपण आहे. बाळ गंगाधर टिळक ते लोकमान्य टिळक या प्रवासाचं जे महत्त्व आहे ते त्या स्वरूपाचं आहे. कुणाही अभ्यासकाला त्याची मोहिनी पडणं हे स्वाभाविक आहे.

१८६१ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर म्हणजे वयाच्या पाचव्या वर्षी बाळ इतर सर्वसाधारण मुलांप्रमाणं शाळेत जाऊ लागला. बाळाचे वडील गंगाधरपंत हे शिक्षण खात्यात सरकारी नोकरीत होते. त्यांच्या बोटाला धरून पुढील शिक्षणास बाळ १८६६ मध्ये पुण्यात दाखल झाला. आज या साऱ्या सुरस कथा ऐकायला ठीक वाटतात. पण बाळ गंगाधर टिळकच नाही तर त्याकाळातील इतरही अनेकांकडून एक गोष्ट नक्कीच घेता येते दोस्तांनो की, श्रमांना, सत्‌शीलतेच्या वागण्याला, जनकल्याणाची सतत आस धरून काम करणाऱ्या व्यक्तीला 'शॉर्ट कट मेथडस्' ने जाऊन चालत नाहीत. फार निष्ठापूर्वक काम करावं लागतं आणि तसं ते केलं तरच आपल्या मृत्यूनंतरही अनेक वर्षं लोक आपल्याला विसरत नाहीत. पण केवळ किडा-मुंगी सारखं, चार चौघांसारखं जगण्यानं लोकमान्य होता येणार नाही. त्यासाठी श्रीहरीच्या शंखाचा स्पर्श मस्तकाला करून घ्यावा लागतो. नाहीतर त्या सर्व मंडळींची गावं खरं तर आजही त्या मानानं मागासलेलीच आहेत. १००-१५० वर्षांपूर्वी या मंडळींच्या गावाची अवस्था काय असेल! कुणी त्यांना पुण्यामुंबईसारख्या, अगदी दिल्लीसारख्या-देखील शहरात जाऊन आपलं नाव करण्याच्या प्रेरण्या दिल्या असतील यांचा अभ्यास होणं जरुरीचं आहे. या मंडळींना कुणी आणि कसा रस्ता दाखवला, ही माणसं नेमक्या कोणत्या ऊर्मी उराशी बाळगून समाज कार्याकडे वळली, आजचा तरुण, त्यांचाच वंशज, असा का? याचा विचार करू या.


१८६९ मध्ये टिळक हायस्कूलमध्ये दाखल झाले. ते १६ वर्षाचे असताना त्यांची वडील वारले. त्याही परिस्थितीत खचून न जाता त्यांनी छात्रवृत्ती मिळवून १८७३ मध्ये कॉलेजात प्रवेश घेतला. १८७९ मध्ये ते कायद्याचे पदवीधर झाले. ज्ञान प्रबोधिनी या शाळेजवळच असलेली न्यू इंग्लिश स्कूल ही शाळा १८८० साली स्थापिली. आपल्या वयाच्या २४ व्या वर्षी बाळ गंगाधर टिळक यांनी इतरांच्या मदतीनं शाळा काढली आहे, हे विसरता येणार नाही. आजचा तरुण वयाच्या २४ व्या वर्षी आपलं स्वत:च शिक्षण पूर्ण करून, रोजगार मिळवून, स्वत:च्या पायावर उभा राहू शकेलच याची खात्री देता येत नाही. मग इतरांच्या



प्रायोजक : विश्वकुमार आर्किटेक्टस् प्रा. लिमिटेड, पुणे.

कल्याणासाठी त्यानं शाळा काढणं खूप दूर राहतं. बाळ गंगाधर टिळक लोकमान्य कसे झाले? त्या प्रश्नाचं उत्तर या अशा काही घटनांमध्ये दिसतं.

२ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' हे इंग्रजी आणि ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' हे मराठी साप्ताहिक, इतर पाच मित्रांच्या मदतीनं लोकमान्य सुरू करतात. त्यावेळी ते केवळ २५ वर्षांचेच असतात. म्हणूनच 'लोकमान्य होण्याचे त्यांचे गुण हे लहानपणापासूनच दिसतात असं लोक म्हणतात. हा माणूस शाळा काढतो. वर्तमानपत्र काढतो, कॉलेज काढतो इतकंच काय पण डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारखी मोठी शिक्षण संस्थाही काढतो. हे फार महत्त्वाचं वाटतं. त्याचबरोबर १८८७ मध्ये मतभेदानंतर गोपाळ गणेश आगरकर यांच्यासारख्या जीवाभावाचा मित्र 'केसरी' सोडून जातो. तरीही न डगमगता ते केसरी पुढं जोरानं चालू ठेवतात. हेही मला खूप महत्त्वाचं वाटतं. 'शहाणे करून सोडावे सकळ जन' या भूमिकेतून त्यांनी पत्रकारिता केली आहे. १८९१ मधे बाळ गंगाधर टिळक हे 'केसरी' व 'मराठा' या दोन्ही नियतकालिकांचे मालक बनतात तेव्हा ते केवळ ३५ वर्षांचे होते हेही विसरता येत नाही. टिळकांच्या काळात आजच्यासारखी संपर्क साधने काहीही उपलब्ध नव्हती. तरीही या माणसानं केलेलं जनजागृतीचं काम प्रभावी तर होतंच. पण ब्रिटिश सत्तेला हादरवून टाकणारं होंत. त्यांनी जनजागृतीसाठी शाळा, महाविद्यालये, शिक्षणसंस्था, वृत्तपत्रे काढली, याबरोबरीनं भाषणं दिली. शिवजयंती आणि सार्वजनिक गणेशोत्सवासारखे जनसंपर्काचे विविध मार्ग



**लाल** **बाल** **पाल**

त्यांनी अनुसरले. प्रचंड वाचन आणि प्रवास केला. हा देश आणि या देशातली माणसं तसंच त्यांच्या भावभावना समजावून घेतल्या. हेही त्यांना लोकमान्य या पदावर नेण्यासाठी महत्त्वाचं आहे.

पुण्यात पसरलेल्या प्लेगाच्या अनुषंगानं लोकमान्यांनी राज्यकर्त्यांवर तर कोरडे ओढलेच. पण साथीच्या रोगांचा अभ्यास करणाऱ्यालाही कदाचित ठाऊक नसेल एवढा प्लेगचा आणि त्याच्यावरच्या उपयांचा विलक्षण तपशील त्यांनी आपल्या 'केसरी' मध्यल्या अग्रलेखांमध्ये देऊन वाचक आणि सरकार दोघांनाही खूप मदत केली. तरीही सरकार व्यवस्थित उपाय योजना करीत नाही आणि जनतेला त्रास देते म्हणून मग **सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?** असा प्रश्न विचारणारा, त्याच शीर्षकाचा अग्रलेखही लिहिली. अनेकदा कारावास सहन केले. केवळ ए.सी. रूममध्ये इजिचेअरवरून बसून 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' अशी पोपटपंची केली नाही. हे सारं करताना त्यांनी, या देशाचा विकास व्हावा, जनतेचं कल्याण व्हावं म्हणून एक महामंत्र दिला. या महामंत्रात लौकिक अर्थानं चार सूत्रं मांडली जातात – १) स्वराज्य २) स्वदेशी ३) बहिष्कार ४) राष्ट्रीय शिक्षण या चार मुद्द्यांच्या जोडीला स्वधर्म आणि स्वभाव या दोन मुद्द्यांची भर घालून लोकमान्यांची चतु:सूत्री न मानता षट्सूत्री मानावी असं मला नम्रपणानं सुचवावंसं वाटतं. कारण त्यांनी स्वधर्म आणि स्वभाषेच्या संगोपनाचा आणि वर्धापनाचा मुद्दाही फार निर्धारपूर्वक मांडलेला आहे.

जनजागृतीची अखंड वृत्ती, कायम शिकवित राहण्याची प्रवृत्ती, जनसामान्यांच्या हिताची कळकळ, असंतोष पेटवत ठेवून स्वत:ला असंतोषाचे जनक म्हटलं तरी चालेल ही ठाम भूमिका कायम, तत्त्वनिष्ठ राहून जनकल्याणाची धरलेली कास, सातत्यानं केवळ जनतेचीच केलेली वकिली, ब्रिटिश राज्यसत्तेला सतत आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून त्यांच्यावर केलेले प्रहार, चांगला तो चांगला आणि वाईट तो वाईटच ही धारणा, मग तो स्वकीय असो की ब्रिटीश, प्रचंड वाचन, प्रश्न समजावून घेऊन त्यांची उत्तर शोधण्याची संशोधकाची आणि निष्काम कर्मयोगाची वृत्ती आणि कधीही जनकल्याणासाठी कारावास पत्करण्याची तयारी! अशा काही अलौकिक गुणांमुळेच बाळ गंगाधर टिळक हे एक सामान्य कुटुंबात जन्मलेले कोकणवासी 'लोकमान्य' या मान्यवर पदवीपर्यंत पोहोचले. पोहोचू शकले, हे आपण लक्षात घेऊ या.

पुण्यातला 'भरत नाट्य मंदिर' हा आपण केंद्रबिंदू मानला वा ज्ञान प्रबोधिनी ही शाळा ही आपण केंद्रबिंदू मानली, तर स्वातंत्र्यपूर्व काळातले अनेक नामवंत नेते, राजकारणी अलौकिक पुरुष याच भागात २-४ किलोमीटरच्या परिसरात वावरलेले दिसतात. मग ते लोकमान्य टिळक असोत, विष्णुशास्त्र चिपळूणकर असोत, भास्कर भोपटकर असोत, शिवराम महादेव परांजपे असोत इतकंच कशाला पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले,

महात्मा गांधी ही मंडळी याच भागात एकेकाळी वावरलेली आहेत हे विसरून चालणार नाही. या परिसरालाच एकेकाळी श्रीहरीच्या शंखाचा स्पर्श झालेला असावा असं ठामपणानं म्हणावंसं वाटतं. किती अलौकिक माणसं होती ही! आणि या एकाच भागात निपजावीत!

'बाळ गंगाधर टिळक ते लोकमान्य असा अलौकिक प्रवास करणाऱ्या आमच्या या नेत्याबद्दल अनेक कथा सांगितल्या जातात. त्यांना देवत्वसुद्धा प्राप्त करून दिलं जातं. हिंदुमहासभेचे एक नेते श्री. भट एकदा सांगत होते.

ते लहान होते. ७-८ वर्षाचे. टिळकांची अंत्ययात्रा दाखवायला त्यांची आई त्यांना कडेवरून घेऊन गेली होती. तिथून ते परतले तेव्हा त्यांनी आईला विचारलं 'आई आपण एवढी अंत्ययात्रा बघून आलो आणि तू लगेच कामाला का लागलीस! तुला अंघोळ नको करायला, काम सुरू करण्यापूवी!' त्यावर त्यांची आई त्यांना म्हणाली, 'बाळ आज नाही आंघोळ करायची. अरे, माणसाच्या अंत्यदर्शनास जाऊन आलं तर आंघोळ करायची हे बरोबर. पण आज तर साक्षात देवच गेला रे. आज कसली आंघोळ करतोस!' टिळक केवळ लोकमान्य नव्हते तर त्यांना देवत्वही पावले होते हेच या आठवणीतून दिसू शकतं.

कै. चित्रावशास्त्री आठवण सांगताना म्हणले होते की, 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे अग्रलेख आमच्या पिढीत तोंडपाठ करणारी मंडळी होती. ते नुसते अग्रलेख नव्हतेच. त्या खरंतर प्रात:स्मरणिकाच होत्या. जसं सकाळी रामप्रहरात रामाचं-देवाचं नाव घेतात ना तसंच टिळकांच्या अग्रलेखांचं वाचन-चिंतन-मनन व्हायचं बाबांनो!, मुखोद्‌गत असणाऱ्या संत वाड्मय वा श्लोकांसारखे लोकमान्यांचे अग्रलेखही पाठ असायचे आणि प्रात:स्मरणिकेसारखे ते म्हटलेही जायचे.'

लोकमान्यांचं देहावसान झालं त्यावेळी प्रचंड गर्दी जमली होती. पाऊस पडत होता. गर्दीमुळं, चेंगराचेंगरीमुळं, लोक अस्वस्थ होऊन गडबड करू लागले होते. लोकमान्यांच्या अंत्ययात्रेची तयारी करण्यात गुंतलेले अनेक नेते तिथं उपस्थित होते. ही गडबड वाढलेली दिसताच खुद्द महात्मा गांधी सरदार गृहाच्या बाहेर आले आणि जमलेल्या जनसमुदायाला उद्देशून म्हणाले, 'गडबड करू नका, शांत व्हा. लोकमान्य टिळक अजून आपल्यातून गेलेले नाहीत ते वरती शांतपणे झोपलेले आहेत. त्यांची चिरनिद्रा भंग पावेल असं काही करू नका'. आणि खरोखरीच जमलेला प्रचंड जनसमुदाय क्षणार्धात आळीमिळी गुपचिळी झाला. अशीही एक आठवण सांगतात. अशा असंख्य कारणांनीच बाळ गंगाधर टिळक हे 'लोकमान्य' या अलौकिक पदवीपर्यंत पोहोचले असावेत असं ठामपणानं वाटतं. ❑❑

- **डॉ. विश्वास मेहेंदळे** संचालक, सिंबायोसिस प्रशिक्षण संस्था, पुणे १६.



प्रायोजक : स्वस्तिक बिल्डर्स (अनिल लोंढा, राजेंद्र गोठी) मखमलाबाद नाक्याजवळ, नाशिक ☎ ७३५९६०




*आजचे युग हे 'संगणक युग' म्हणून ओळखले जाते. आपल्यापैकी काही जणांचा संगणकाशी परिचय असेलही परंतु भविष्यात आपल्यापैकी प्रत्येकाला कोणत्याही क्षेत्रात काम केले तरी संगणकाचा वापर हा अपरिहार्य ठरणार आहे. तत्पूर्वी संगणकाशी आपली निदान तोंडओळख तरी असावी म्हणून या अंकापासून 'ओळख संगणकाशी' ही लेखमाला सुरु करीत आहोत.*

हल्लीचे युग हे 'संगणकाचे युग' आहे किंवा ''जग झपाट्याने बदलत आहे, ही संगणकाने आणलेली क्रांती आहे,'' असे काही जड जड शब्द तुम्ही ऐकले आहेत का? त्यामुळेच संगणक ही काहीतरी अवघड, क्लिष्ट गोष्ट आहे, असा काही तुमचा समज झाला आहे का ? तसे असेल, तर तो गैरसमज लगेच काढून टाका. कारण संगणक हा आपला चांगला मित्र आहे. तो आपली अवघड कामे सोपी करतो आणि तेही तुम्हांला आवडेल अशा पद्धतीने. तो वापरताना मुळीच कंटाळा येत नाही. शिवाय आपला वेळ कसा गेला तेही कळत नाही.

आकडेमोड करण्यासाठी गणकयंत्रावर (कॅल्क्युलेटर) बटने दाबत वैतगलेली माणसे गणकयंत्रावरून कागदावर काहीतरी लिहून घेताना तुम्ही पाहिली आहेत का? किंवा थोडासा मजकूर जरी बदलला तरी सगळ्या पत्राचे टंकलेखन (टायपिंग) परत पहिल्यापासून करावे लागणार म्हणून रागावलेले कारकूनसाहेब? किंवा एखादी माहिती तातडीने लागणार आहे म्हणून शेकडो फाईली पालथ्या घालणारी एखाद्या सरकारी कचेरीतली त्रस्त माणसे तुम्ही बघितली आहेत का? तुम्हांला असं नाही वाटत, की यांचं काम सोपं करण्याची खूप गरज आहे? त्यांना कुणी मदत करणारा सोबती मिळाला, तर ती माणसंही आपल्यासारखी आनंदात दिसतील! तर असा सोबती आहे, आपला संगणक. मोठमोठ्या आकडे मोडी तो भराभर करतो, न चुकता! आणि उत्तर लिहून घ्यावं लागतं नाही, तो आपल्याला छापून देऊ शकतो. थोडासा मजकूर बदलला, तरी केवढा बदल करता येतो. पहिल्यापासून टंकलेखनाची गरज नाही. एवढेच काय, शेकडो फाईलींमधून हवी ती माहिती, काही क्षणांमध्ये तो शोधून देतो! आहे की नाही गंमत?

आता तुम्हांला वाटलं असेल, की संगणक हा फार बुद्धिमान असतो, इथेच तर तुम्ही फसता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याला बुद्धी अजिबात नसते. मग असतं तरी काय? तर ते एक यंत्र आहे. असं यंत्र, की ज्याला खूप खूप स्मरणशक्ती आहे. खूप जास्त गती आहे आणि अचूकता आहे. पण त्याला विचार मात्र करता येत नाही, भावनाही नसतात. तर आपण सांगू ते काम भराभर आणि न चुकता करणारा तो एक 'सांगकाम्या' आहे!

(क्रमशः)

**– प्राजक्ता महाजन,** कृषि–तांत्रिक विद्यालय,
खेड–शिवापूर, ता. हवेली, जि. पुणे



प्रायोजक : मे. आर. डी. वीरकर आणि कं. वीट कारखानदार. सिंहगड रस्ता, पुणे

# वाळवी आणि दीप

– मूळ कन्नड लेखक :
***श्री. व्यासराय बल्लाळ,***
मराठी अनुवाद :
***सौ. मीना वांगीकर***



विकृत वाटणाऱ्या त्या घाणेरड्या चेहऱ्यावर देवीचे व्रण होते. चेहरा वाळवी लागल्यासारखा दिसत होता. त्या चेहऱ्यावर फक्त म्हातारपणाच्याच खुणा दिसत नव्हत्या, तर मृत्यूची छायादेखील डोकावत होती! त्याला पहिल्यांदा पाहिले तेव्हा, हा विकृत चेहरा चितेत कसा जळेल असा घाणेरडा विचार प्रथम माझ्या मनात आला.

परंतु या विचाराची मलाच लाज वाटली. मी त्याला चर्चगेट स्टेशनवर उत्तरेला जायला सज्ज असलेल्या एका लोकल गाडीच्या फर्स्ट-क्लासच्या डब्यात प्रथम पाहिले.

तो आत शिरत असताना, ''अरे काका, हा फर्स्टक्लासचा डबा आहे, पुढे जा.'' मी खेकसलो. त्याने माझे बोलणे न ऐकल्यासारखे दाखवून, माझ्याजवळ उभे राहून विचारले, ''ही गाडी दादरला थांबते का?''

''दादरला थांबते. परंतु फर्स्टक्लासचे तिकीट न काढता ह्या डब्यात प्रवास केला तर दहा रुपये दंड द्यावा लागतो, ठाऊक आहे का?'' मी उलट सवाल



प्रायोजक : मे. ओम् कन्स्ट्रक्शन, प्रो.प्रा. माणिकराम हळबे, पुणे ४११ ०३०.

केला.

''ठाऊक आहे. पण तुम्ही आहात की ह्या बिचाऱ्या म्हाताऱ्याच्या मदतीला.''

''ओ, असं काय? टी.सी.ला येऊ दे, तू पकडला जाशील तेव्हा दहा रुपये घालविणारे धर्मरायासारखे पुण्यवान लोक ह्या गाडीतून प्रवास करत नाहीत हे तुला कळून चुकेल. लवकर जाऊन दुसरा डबा पकड.'' तो काहीच बोलला नाही. तेथून गेलाही नाही. दोन्ही हात जोडून मला नमस्कार केला. तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करून गप्प बसलो. पुढच्याच क्षणी मी त्याला विसरलो.

पण अशाच लोकांची शिकार करणारा टी.सी.टपकलाच, त्याचा खांदा हलवून 'टिकेट' म्हणाला, तेव्हा माझे कुतूहल पुन्हा जागृत झाले. त्याच्या हातात तिसऱ्या वर्गाचे तिकीट होते.

''दहा रुपये व तिकिटाचे पैसे काढ. हा फर्स्टक्लास आहे.'' टी.सी. खेकसला.

मी त्याच्याकडेच पाहत होतो. गाडीतील सर्वांचे लक्ष त्याच्याचकडे होते. जवळच उभ्या असलेल्या माझ्याकडे पाहून, तो मघासारखे हात जोडून म्हणाला, ''मी म्हातारा आहे. माझ्याजवळ पैसे नाहीत, घाईत आलो. कसेतरी करून मला सोडवा.'' ती दीनपणे गयावया करू लागला.

माझ्या चेहऱ्यावर विजयी भाव होता. ''दहा रुपये दान करणारे पुण्यात्मे अशा गाडीतून प्रवास करत नाहीत! असं मी मघाशीच सांगितलं नव्हतं का?'' मी जोरात म्हणालो.

''नक्कीच असतात. तुम्ही नाहीत का? कृपा करून मला सोडवा.'' म्हणत त्याने त्या गर्दीत एकदम खाली बसून माझे दोन्ही पाय धरले.

मला एकीकडे संताप, दुसरीकडे अपमान व तिसरीकडे ह्या अगतिक म्हाताऱ्याबद्दल तिरस्कार ह्या सर्व भावना दाटून आल्या व ''सोड रे!'' म्हणत मी माझे पाय झटकले.

म्हातारा धाय मोकलून रडू लागला. गाडी एलफिस्टन रस्त्याच्या जवळ येताच टी.सी. त्या म्हाताऱ्याचा खांदा पकडून, ''चलो, बदमाश... असली नाटकं पुरे झाली, चल उतर खाली.'' असे ओरडला.

त्याक्षणी मला काय वाटलं कोणास ठाऊक! मी टी.सी.ला उद्देशून म्हणाला, ''थांब.'' माझ्याकडील अकरा रुपये दिले व म्हणालो, ''त्याला सोडून द्या.''

फक्त टी.सी.च नव्हे तर माझ्याभोवती उभे असणारे सर्वजण 'तुला वेडबीड लागलंय का' अशा नजरेने माझ्याकडे पाहत होते.

दादर स्टेशन आल्यावर टी.सी.च्या पाठोपाठ मीही गाडीतून उतरलो. माझ्याच बरोबर तो म्हाताराही उतरला. गाडीत त्याच्यावर आलेल्या आगतिक परिस्थितीने माझ्या मनात उद्भवलेली, मलाच अपरिचित असलेली अनुकंपा आता उरली नव्हती. ऐकणारे हसतील


*हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे, आचंद्र सूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।*

चि. ऋषिकेश कुलकर्णीकडून प्रबोधकांना शुभेच्छा !

अशा परिस्थितीत मी दहा रुपये गमावून बसलो होतो. ते दु:ख व आता हा इसम आपला पिच्छा सोडणार नाही. हा राग ह्या दोन्ही भावनांच्या गोंधळात त्या प्रचंड गर्दीतून वाट काढीत मी स्टेशनबाहेर पडलो.

बाहेर येऊन रस्ता ओलांडण्यासाठी उभा होतो तोच त्याची हाक ऐकू आली.

‘‘साहेब!’’

‘‘आता काय आणखी?’’ मी मागे वळून खेकसलो.

‘‘साहेब, तुम्ही खूप उदार मनाचे आहात. म्हाताऱ्यावर दया दाखवलीत. मोठ्या मनाने माझ्या चुकीसाठी दंड दिलात. फर्स्टक्लासचा डबा माझ्यासारख्यांसाठी नाही हे मला ठाऊक आहे. परंतु आज माझं डोकंच ठिकाणावर नाही. माझ्या एका चुकीमुळे माझी नोकरी जाईल. नोकरीखेरीज मी जगू शकत नाही....’’

त्याचे बोलणे मला न समजल्यामुळे मी विचारले, ‘‘कसली नोकरी?’’

‘‘मी एका पुस्तकाच्या दुकानात सेल्समन आहे. वर्षानुवर्षे पुस्तकांना सांभाळत व विकत आलो आहे. परंतु सांभाळण्याच्या कामात एक मोठा अपराध झाला. एका पुस्तकाच्या ढिगाला वाळवी लागल्याचे माझ्या लक्षात आले नाही. ती सर्व पुस्तके वाळवीने खाऊन टाकली. मालकांना अतिशय राग आला. बहुतेक माझी नोकरी जाणार...’’

मी चालतच होतो. त्याने ही गोष्ट मला सांगण्याचे कारण मला समजले नाही. पुन्हा मदत मागण्यासाठी ही पूर्वपिठीका आहे का अशी शंकाही आली. परंतु त्या क्षणी तो म्हातारा स्पष्टपणे माझ्याशी बोलत चालत असताना, माझ्या मनातील राग जरा कमी झाला.

‘‘तुमच्यासारख्या बुद्धिमान माणसाला मी काय सांगणार साहेब! नोकरी गेल्यातच जमा आहे. उद्या बहुतेक जाईल. उद्याची चिंता सतावत आहे. ते अकरा रुपये टी.सी. ला देण्यापेक्षा मलाच दिले असते तर चार दिवस.... आणखी दहा रुपयांची दया दाखवू शकाल काय? माझ्याकडे एकही पैसा नाही साहेब...’’ माझी पावले भराभर पडू लागली. चांगुलपणाला असाच शेवट येणार ह्याची खात्री पटली.

‘‘क्षमा करा, तुम्ही समजताय तसा मी काही बुद्धु नाही,’’ असे तावातावाने बोलून त्याचा संबंध तोडून टाकल्यासारखा मी पुढे गेलो. घरी जाऊन शांताचा चेहरा पाहीपर्यंत मी त्याच्याबद्दल विचार करत होतो. तो आहे तरी कोण? त्याचे जीवन किती घाणेरडे असावे? पुस्तकांना वाळवी लागल्यामुळे ह्याची नोकरी जाणार तर अशी भीक मागून जगण्यापेक्षा मरणे बरे असे कसे त्याला वाटत नाही? दुसऱ्याचे उष्टे खाऊन जगणार ह्याची बायका पोरं....

घरी आल्यावर घरच्या सुखकर वातावरणात माझे थकलेले शरीर व मन फुलू लागले.



शिरिष पोंक्षे व प्रसाद पुरंदरे यांच्याकडून धडपडणाऱ्या प्रबोधकांना शुभेच्छा!

''अकरा रुपये दंड भरून फर्स्टक्लासमध्ये प्रवास करत असलेल्या एका अगतिक माणसाला आज मी टी.सी. च्या हातून सोडवलं, शांता.'' मी आपला गुन्हा कबूल करण्याच्या आवाजात म्हणालो.

''काय?'' तिने गोंधळून विचारले, ''तुम्हांला वेडबीड लागलंय का?''

''जाऊ दे गं, शांता, एका दुर्बल क्षणी मला त्या माणसाची दया आली, दिले झालं.'' त्याक्षणी ती घटना माझ्या मनातून बाजूला झाली. त्या माणसालाही मी विसरलो. इथे ही गोष्ट संपायला हवी.

परंतु...

ही घटना घडून दोन आठवडे झाले. नेहमीप्रमाणे मी माझ्या रोजच्या वर्तुळात हरवून गेलो होतो. मी स्वत:च निर्माण केलेल्या घर व ऑफिस या आत्मीय वर्तुळात माझे मन प्रकाश शोधत होते.

एक दिवस ऑफिसच्या कामात गर्क असताना माझ्या एका सहकाऱ्याचा इंटरकॉमवरून फोन आला.

''राव?''

''काय बर्वे?''

''हा म्हातारा तुला कुठे भेटला?''

''कोणता म्हातारा?''

''कम ऑन, कट इट नाऊ, कुलाब्याच्या 'लवली' पुस्तकाच्या दुकानाचा म्हातारा.''

''मला काही समजत नाही.

''हे पाहा राव, माझ्याशी नाटक करू नकोस. त्या म्हाताऱ्याने तुझे नाव घेऊन विचारले नसते तर मी पण विश्वास ठेवला नसता. हवं तर तू कुलाब्याच्या त्या दुकानाचं गिऱ्हाईक आहेस हे मी कुणालाही सांगणार नाही.''

''नाही रे बर्वे, पुस्तकाच्या दुकानाचं गिऱ्हाईक होण्यात लाज वाटण्यासारखे काय आहे बरं? मला समजत नाही. खरोखरच मला कुलाब्यातील कोणत्याही पुस्तकाच्या दुकानातील म्हाताऱ्याचा परिचय नाही.''

''वा रे वा ! तुला परिचय नाही, पण त्याला आहे. त्याच्या कोटाच्या खिशात तुझ्या आवडीच्या सिनेमांची मासिके मिळतील! जा रे, राव त्यात एवढं लपविण्यासारखं काय आहे? गुरखा त्याला आत सोडत नव्हता. नेमका त्याच वेळेला मी आत येत होतो. त्याला तुला भेटायचं आहे. रिसेप्शन् डेस्कजवळ बसवलं आहे. तो तुझ्या केबिनमध्ये यायला नको असेल तर तूच जाऊन त्याला भेट.बाय'' ''डॅमइट्'' म्हणत मी रिसीव्हर खाली ठेवला.

कोण बरं असावं असा मी विचार करत होतो. विचार करता करता मी मागे पाहिलेला घाणेरडा चेहरा माझ्या नजरेसमोर आला. तो कशाला आला असावा? कसा आला असावा? माझं नाव पत्ता त्याला कळला कसा?

कोणीही असला तरी माझ्या केबीनमध्ये यायला नको आणि मीच

*(पान ३७ वर पुढे चालू)*



छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे.

# मेंदी काढू या!


**नीता ओसवाल**

श्रावण महिन्यातल्या सणांच्या गर्दीतच येते नागपंचमी! आणि आठवण होते मेंदीने रंगविलेल्या हातांची! 'कोनाने नक्षी काढणे' हा त्यातील कौशल्याचा भाग येत असेल तर, मग अजून धम्माल येते. रात्री उशिरापर्यंत मेंदी काढत बसायला! तर नेमके हे कोन कसे करतात?

जाड प्लॅस्टिकचा चौरसाकार १० बाय १० सेंमी.चा कागद घेऊ या. त्याची चौपदरी घडी घालायची आहे. तशी घडी घातली की चारही घड्यांची सुटी टोकं जेथे एकत्र आली आहेत तेथे वर्तुळाकार कापायचे आहे. (आकृती३) वर्तुळाकार कापल्यानंतर तो तुकडा आकृती ४ मध्ये दाखविल्याप्रमाणे दिसेल. मग कोणत्याही एका कोपऱ्यातून कागद उचलून फुटाण्यासाठी करतो तशी पुडी तयार करायची. एक सुटा कागद पुडीच्या वरती येतो. तो टिक्सो टेपने चिकटवायचा. अगदी कोनाच्या वरच्या बाजूपर्यंत चिकटवायचा. कोन तयार झाला. उजेडामध्ये कोनाच्या मोठ्या बाजूकडून पाहिल्यावर त्यात एक बारीक छिद्र दिसायला हवे.

दोन पदरी फडक्याने गाळलेली मेंदी, निलगिरी, लिंबू, पाणी घालून साधारण पेस्टसारखी करायची. दोन तास आधी भिजवून नंतर ती तयार झालेल्या कोनात घालायची. कोनाची वरची सुटी टोके दुमडून टिस्को टेप लावून बंद करायची. त्यामध्ये हवा अजिबात राहता कामा नये. आता आपला मेंदी भरलेला कोन तयार झाला. चला नक्षी काम करू या.

पेन धरतो त्या पद्धतीने कोन धरायचा आहे व दाबून त्यातून मेंदीची नक्षी





प्रायोजक : दिलीप टेलर्स, १२७३, सदाशिव पेठ, नवा विष्णू चौक, पुणे ३०.

काढायची आहे. सर्वात आधी एक सरळ रेघ काढता येते का ते पाहा. हातावर दोन तिरक्या रेघा मारा. अशाप्रकारे मेंदी काढताना नेहमी दाब कमी-जास्त होऊ देऊ नका. मग वर्तुळ जमते आहे का ते पाहा. सुरुवातीचा भाग जमला की हात भरेल अशी नक्षी घ्यायची. त्यात कोयरी(आ.५), मोर, पानाफुलांची (आ.६) नक्षी असे प्रकार येतील. आकार ठरवल्यानंतर त्यात काय काढायचे ते ठरवाते. फुले, पाने, छोट्या कोयऱ्या




आल्यानंतर उरलेला भाग चेक्स, रेघा, खवले यांनी भरवा. तसेच बोटांवर नक्षी काढताना ओघवती नक्षी काढायची.

मग जमलं ना? नागपंचमीच्या आधी छान नक्षीकाम केलेला हात असणार तर...!

❑❑

– **नीता ओसवाल**

ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.



## नावीन्यपूर्ण राखीपौर्णिमा

दरवर्षीप्रमाणे श्रावणातल्या पौर्णिमेला याही वर्षी राखी बांधायची आहे. पण त्यात नावीन्य काय आणता येईल? राखीपौर्णिमेची परंपरागत पद्धत 'बहिणीने भावाला राखी बांधायची' याबरोबरच अनेकांना स्नेहाने बांधणारी ही राखी कोणा कोणाला बांधता येईल?

- जवळच्या अनाथाश्रम, बालसुधार गृह, तुरुंग या ठिकाणी जाऊन तेथील मुलांना राखी बांधणे, त्यांच्याशी खेळणे, गप्पागोष्टी करणे, मैत्री वाढवणे.
- शासकीय रुग्णालयात जाऊन तेथील रुग्णांना राखी बांधणे, त्यांची विचारपूस करणे, सुश्रुषा करणे, आवश्यक ती मदत करणे.
- अन्य पंथ-धर्मांमधील व्यक्तिंना घरी जाऊन तर, धर्मगुरुंना धार्मिक स्थळांमध्ये जाऊन राखी बांधणे आणि स्नेहभावना व्यक्त करणे.


तुम्ही राखीपौर्णिमा कशी साजरी केलीत ते कळवा.



*With Best Compliments From* MEDINI EXPORTS PVT. LTD. Pune

# कथा ऑलिंपिकची


**– हेमंत जोगदेव**



गेले काही दिवस आपण नक्कीच दूरचित्रवाणीच्या संचासमोर बसून असाल, आणि अमेरिकेतल्या ॲटलांटा शहरात चालू असलेली जगातील सर्वश्रेष्ठ ऑलिंपिक स्पर्धा पाहत असाल. तसं नसेल तर अजूनही वेळ गेलेली नाही. दि. ५ ऑगस्टच्या पहाटेपर्यंत जेवढा वेळ ती पाहता येईल तेवढी पाहा. अगदी एकाग्र चित्तानं आणि मन लावून पाहा. रात्रीचं जागरणं करावं लागलं तरी हरकत नाही; कारण जगातील असा हा भव्य सोहळा पुन्हा चार वर्षात पाहायला मिळणार नाही. त्यातच यंदा ऑलिंपिकची शताब्दी आहे. म्हणजे तर यावेळचं तिचं स्वरूप केवढं वैभवाचं असेल ते वेगळं सांगायलाच नको.

तसं पाहिलं तर आपण किती भाग्यवान आहोत! ग्रीसमधल्या अथेन्स शहरात १८९६ मध्ये ऑलिंपिकची पहिली स्पर्धा सुरू झाली. ती फक्त स्टेडियमवर उपस्थित होते तेवढ्यांनाच पाहता आली. पुढची ४० वर्षे तीच स्थिती होती; पण १९३६ मध्ये जर्मनीतल्या बार्लिन शहरात जी स्पर्धा झाली ती मात्र त्या शहरातल्या लोकांना 'क्लोज सर्किट टी.व्ही' द्वारे पाहता आली. म्हणजे जेमतेम पाच-सहा मैलांच्या परिसरातच ती दाखविता आली. त्यानंतरही त्यात फारसा फरक पडला नाहीच. पण हळूहळू ती स्पर्धा जवळपासच्या देशांनासुद्धा दिसू लागली. पण मेलबोर्न, टोकिओ आणि मेक्सिकोला ती स्पर्धा झाली तेव्हा 'खूप दूर' असल्यामुळे युरोपातील देशांना पाहता आली नाही. उलट ती स्पर्धा पुन्हा युरोपात झाली तेव्हा अमेरिकेत ती दिसणार नव्हतीच. पण मग म्युनिकच्या स्पर्धेसाठी जर्मन तंत्रज्ञांनी एक युक्ती योजली. त्यांनी ॲटलांटा समुद्रात विशिष्ट अंतरावर बोटी उभ्या केल्या आणि म्युनिक शहरातील ती स्पर्धा टप्प्याटप्प्याने प्रक्षेपण करीत अमेरिकेपर्यंत नेली. ह्या घटनेला फार नाही तर केवळ वीस वर्षे झाली.


पण त्यानंतर जादूची कांडी फिरावी तशा इलेक्ट्रॉनिक्सच्या



क्षेत्रात, अशा काही झपाट्याने सुधारणा होत गेल्या, की काही विचारूच नका. त्यातच माणसाच्या हातात उपग्रह आला आणि जगात एक वैज्ञानिक क्रांतीच सुरू झाली आणि ऑलिंपिक हे तर साऱ्या जगाचं लाडकं बाळ. मग विज्ञानानं स्वत:ला ऑलिंपिकमध्ये असं काही झोकून दिलं की त्या माध्यमातून ती स्पर्धा बघता



प्रायोजक : महाराष्ट्र ॲग्रिकल्चर बायोटेक, पुणे ३०.



बघता जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचली. अवघ्या ३-४ सेकंदाच्या आत ती स्पर्धा जगातल्या कोणत्याही भागात, कोणत्याही घरादारात जाऊन पोहोचते.



मॉँट्रिअल स्पर्धेत म्हणजे १९७६ मध्ये तर कमालच झाली. ग्रीसहून ऑलिंपिक ज्योत आणायला तेथील स्थानिक लोकांनी थोडा विरोध दाखविला. तर कॅनडाच्या स्पर्धा संयोजकांनी ती ज्योत ग्रीसहून उपग्रहाच्यामार्फत ॲटलांटा महासागरा-वरून कॅनडाच्या भूमीवर नेली. ग्रीस देशात ऑलिंपिया नावाचं एक अतिशय निसर्गरम्य सुंदर गाव आहे. तेथे इसवी सनापूर्वी प्राचीन ग्रीक लोक ऑलिंपिक स्पर्धा घेत.


त्याच पवित्र जागेवर ऑलिंपिकची ज्योत, एका विशिष्ट पद्धतीने प्रज्वलित केली जाते. विशिष्ट तेल लावलेल्या कापडावर एका मोठ्या भिंगातून उन्हाचा कवडसा टाकला जातो. त्यातून प्रखर उष्णता निर्माण होऊन ज्योत प्रज्वलित होते. मग ती ज्योत ऑलिंपिकच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्त केली जाते. मग ग्रीक ॲथलेट ती ज्योत सुमारे २५० मैल रस्त्याने धावत दौडीने अथेन्समध्ये आणतात. अथेन्सच्या प्राचीन स्टेडियमवर शानदार समारंभात ती यजमान देशाच्या स्पर्धा-संयोजकांच्या स्वाधीन केली जाते. तेथून ती स्पर्धा-शहरापर्यंत मार्गात येणाऱ्या देशातून दौडीने आणली जाते. या प्रथेला बर्लिन स्पर्धेपासून म्हणजे १९३६ पासून प्रारंभ झाला. त्याआधी थेट स्टेडियमवरच ती प्रज्वलित केली जात असे.





प्रायोजक : कौशिक एंटरप्राईजेस, पुणे - ३८.

अशा रितीने स्पर्धेच्या मुख्य स्टेडियमवरती ज्योत आणण्याचा बहुमान तेथील एखाद्या माजी ख्यातनाम क्रीडापटूला दिला जातो. ती ज्योत स्पर्धेच्या सर्व दिवस अखंडपणे तेवत ठेवली जाते. समारोपाच्या वेळी सूर्य अस्ताला जाताना मोठ्या नाट्यपूर्ण रितीने पण तितक्याच गांभीर्याने मालवली जाते.



आहे. पण त्याची निर्मिती कशी झाली ते आहे ठाऊक?

ऑलिंपिकचे जन्मदाते पॅरी बॅरन द कुबर्टिन हे १९१३ साली ग्रीसच्या दौऱ्यावर असताना तेथील डेल्फी या गावी गेले. तेथे प्राचीन काळी ऑलिंपिक स्पर्धा होत. ते गाव ग्रीकांचे महत्त्वाचे धार्मिक स्थळ होतं.

तेथे काही प्राचीन अवशेष आहेत आणि तेच पाहण्यासाठी श्री. कुबर्टिन

***दर चार वर्षांनी एकदा होणाऱ्या या अतिभव्य महोत्सवाने माणसाच्या उत्तुंग प्रगतीची अनेक शिखरे दाखविली. त्या शिखरांनी देश, जात, वय अशा कशाचाही भेद मानला नाही. त्यामुळेच ज्या वयात प्राथमिक शाळेचे शिक्षणही पूर्ण झालेले नसते, त्या वयाच्या नवव्या वर्षीसुद्धा जागतिक अजिंक्यपद मिळवता येते हे नॉर्वेच्या शाळकरी मुलगी सोन्या हेनी हिने दाखवून दिले.***

***हिवाळी ऑलिंपिकमध्ये फिगर स्केटींग नावाचा बर्फावरच्या कसरतींचा खेळ आहे. त्यात सोन्या हेनी हिने ती कामगिरी केली. पुढे त्याच खेळाच्या प्रचारासाठी तिने जगभर प्रदर्शनी कार्यक्रम केले. त्यातून तिने खेळाचा तर प्रसार केलाच पण अब्जावधी डॉलर्स पैसा मिळविला.***

शपथविधी हाही एक पारंपरिक औपचारिक कार्यक्रमाचा भाग असतो. प्राचीनकाळी ऑलिंपिक स्पर्धेपूर्वी देवालयात झूस्स देवाच्या साक्षीने ती स्पर्धकांना आणि अधिकाऱ्यांना घ्यावी लागत असे. आताच्या स्पर्धेत यजमान देशाचा खेळाडू प्रातिनिधिक स्वरूपात सर्व खेळाडूंच्या वतीने ती शपथ घेतो.

पाच वर्तुळांचे ऑलिंपिकचे बोधचिन्ह आता आपल्या चांगलेच परिचयाचे झाले

तेथे गेले होते. तर त्या अवशेषातील एका दगडी मोठ्या चौथऱ्यावर त्यांना हे पंचवर्तुळाकार चिन्ह कोरलेले दिसले. त्या चित्राने त्यांचे मन वेधून घेतले.



श्री. कुबर्टिन यांनी त्या वर्तुळांचा एक विशिष्ट अर्थ काढला. त्यांना वाटलं की ही पाच वर्तुळे म्हणजे जगातली पाच खंडे आहेत आणि ती एकमेकांमध्ये





प्रायोजक : परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली.



गुंफली आहेत म्हणजेच त्यांच्यात एकात्मतेची भावना आहे. आणि ऑलिंपिकचे तर हेच नेमके उद्दिष्ट आहे. तेव्हा ऑलिंपिकच्या विचारांचे प्रतिबिंब त्यांना त्या पंचवर्तुळातून दिसले आणि तेच ऑलिंपिकचे बोधचिन्ह बनले. श्री. कुबर्टिन यांची ती कल्पना सर्व सहकाऱ्यांनाही आवडली.

मग त्याच वर्तुळाचे रंग निश्चित करण्यात आले. त्यांचा क्रमसुद्धा निश्चित करण्यात आला. वरच्या तीन वर्तुळांचा रंग अनुक्रमे निळा, काळा आणि लाल, तर खालच्या दोन वर्तुळांचा अनुक्रमे पिवळा आणि हिरवा. असे हे रंगीत चित्र पांढऱ्या स्वच्छ कापडावर चितारण्यात आले. तेव्हा झाला तयार ऑलिंपिकचा ध्वजही. म्हणजे पांढरा हा आणखी एक म्हणजे सहावा 'रंग'. त्याचीही कल्पना अशी की जगातल्या सर्व देशांच्या राष्ट्रध्वजामध्ये या सहापैकी





किमान एक रंग तरी असलाच पाहिजे. कारण ते रंग म्हणजे 'रंगाच्या दुनियेतील' मूलभूत रंग मानले जातात.


मूळचा 'ध्वज' हा कुबर्टिन यांनी सांगितला त्याबरहुकूम कुबर्टिन यांच्या फ्रान्समधल्या एका शिंप्याने तयार केला. ३ मी. लांब आणि २ मी. रुंद अशा एका सॅटीनच्या कापडावर तो एम्ब्रॉयडरीने विणला गेला. तो ध्वज बेल्जमने तयार करून ऑलिंपिक संघटनेला भेट म्हणून दिला. ॲन्टवर्प स्पर्धेत तो प्रथमच वापरला गेला. पुढे अनेक वर्षे तोच ध्वज 'अधिकृत' होता. पण तो आता खूप जुना झाल्यामुळे एका सुरेख मखमलीच्या पेटीत अतिशय काळजीपूर्वक सांभाळला जातो. स्पर्धेच्या जागेवर आणला जातो. सेऊल येथे १९८८ मध्ये स्पर्धा झाली. तेव्हा खास कोरिअन कापडाच्या बनावटीचा नवा ध्वज तयार करण्यात आला आणि तो कोरियाने ऑलिंपिक संघटनेकडे सुपूर्त केला. तोच ध्वज आता प्रत्यक्ष वापरला जातो; पण त्या पुढच्या यजमान देशाकडे चार वर्षांसाठी सुपूर्त करण्याच्या औपचारिक विधीसाठी मात्र मूळचा (बेल्जम) ध्वजच वापरला जातो.

ॲटलांटाची ऑलिंपिक स्पर्धा पाहताना आपण त्या स्पर्धेच्या जन्मदात्याची जरूर आठवण ठेवली पाहिजे. शंभर वर्षांपूर्वी



प्रायोजक : डॉ. अविनाश लेले, सावित्री आयुर्वेद प्रतिष्ठान, अत्रेय रुग्णालय, एरंडवणा, पुणे


त्यांना किती अफाट कष्ट करावे लागले, किती मन:स्ताप सहन करावा लागला आणि आपल्या साऱ्या संपत्तीवर कसं पाणी सोडावं लागलं ते पाहिलं की आश्चर्यच वाटेल. त्या जन्मदात्याबद्दल अगदी थोडक्यात माहिती घेऊ.



तर ते जन्मदाते म्हणजे बॅरन द कुबर्टीन. हे एक महान फ्रेंच तत्त्ववेत्ते होऊन गेले. त्यांचा जन्म एका श्रीमंत घराण्यात झाला. अभ्यासूवृत्ती रक्तातच भिनली असल्यामुळे परंपरावादी असूनही नव्या विचारांबद्दल कमालीची ओढ! अशा या थोर तत्त्ववेत्त्याला फ्रेंच सरकारने शैक्षणिक सुधारणा मंडळाच्या अध्यक्षपदी नेमले. जगातल्या विविध शिक्षणपद्धतींचा अभ्यास करून फ्रान्सच्या शिक्षणविषयक धोरणात बदल करण्यासंबंधात शिफारस करण्याची श्री. कुबर्टिन यांच्यावर कामगिरी सोपविण्यात आली.

त्यानिमित्ताने श्री. कुबर्टिन हे जगभर फिरले; पण इंग्लंडमधल्या तत्कालिन शिक्षणपद्धतीचा त्यांच्या मनावर जबरदस्त पगडा बसला. तेथील शिक्षण पद्धती ही शारीरिक शिक्षणावर आधारित होती. त्यामुळेच इंग्लंडची नवी पिढी अधिक सुसंस्कृत, अधिक शरीरसंपन्न आणि अधिक उमद्या स्वभावाची बनली आहे हे त्यांच्या लक्षात आले. शारीरिक शिक्षणातूनच माणूस अधिक चांगला आणि शिस्तबद्ध, समंजस नागरिक बनतो यावर त्यांचा पूर्णपणे विश्वास बसला. इंग्लंड हा तसा केवढा छोटासा देश. तरी तो साऱ्या जगावर साम्राज्य कसे करू शकतो याचे उत्तर त्यांना इंग्लंडच्या शिक्षणपद्धतीत आढळले.

योगायोग असा की त्याचवेळी ऑलिंपिक पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नांची लाटच आली होती. विशेषत: इंग्लंड, जर्मनी, स्वीडन आणि ग्रीसमध्ये ते प्रयत्न मोठ्या नेटाने चालले होते. त्यातच ऑलिंपिया (ग्रीस) गाव जमिनीत गाडले गेले होते, ते जर्मन संशोधकांनी तेथे उत्खनन करून जमिनीबाहेर काढले. त्यामुळे तर ऑलिंपिकच्या पुनरुज्जीवनाच्या प्रश्नाला अधिकच चालना मिळाली. मग श्री. कुबर्टिन यांनी ग्रीकांच्या प्राचीन स्पर्धेचा सखोल अभ्यास केला. त्यातील विचारांनी तर ते भारलेच गेले. विशेषत: प्राचीन ऑलिंपिक स्पर्धा जाहीर झाल्या की त्यावेळच्या लढायासुद्धा पूर्णपणे बंद केल्या जात. सर्व सैनिक शस्त्रास्त्रे खाली ठेवीत. ऑलिंपिकला जाणाऱ्या सर्व खेळाडूंना, अधिकाऱ्यांना आणि प्रेक्षकांनाही सर्व राज्यातील सर्व रस्ते पूर्ण खुले आणि संरक्षित बनत. ऑलिंपिकचे सर्व खेळाडू एकत्र राहत. शुद्ध शाकाहारी आहार घेत. देवपूजा, अग्नीपूजा आणि अन्य धार्मिक आचारांवर






केदार देवगावकर याच्यावतीने छात्र प्रबोधनच्या वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

त्यांचा विश्वास असे. परस्परांविषयी कमालीची सहिष्णुता, आदरभाव विचारांची देवाण-घेवाण आणि एकात्मतेचे ते पुजारीच होते. याशिवाय कलात्मकता, वास्तुशिल्प-कला, नृत्यनाट्य, संगीत, साहित्य, काव्य अशा सर्व गुणांची ऑलिंपिकमध्ये कदर होत असे.... या आणि अशा सर्व रुढी आणि परंपरा निर्माण करण्याबद्दल ऑलिंपिक विचारांनी श्री कुबर्टिन यांना झपाटलेच आणि त्यांनी सारे आयुष्य ऑलिंपिकसाठी झोकून द्यायचे ठरविले आणि ते कृतीतही आणले.

१८९६ मध्ये ऑलिंपिकची पहिली स्पर्धा ग्रीसमधील अथेन्स या राजधानीत झाली आणि त्याच स्पर्धेने आंतरराष्ट्रीय क्षितीजावर एक नवे पर्व सुरू केले. गेल्या शंभर वर्षात झालेल्या दोन युद्धांमुळे एकूण तीन ऑलिंपिक स्पर्धा रद्द कराव्या लागल्या.

ॲथलॅटिक्समध्ये धावण्याच्या शर्यतीशिवाय लांब, उंच आणि पोल वॉल्ट अशा तीन उड्या, तर भाला, हातोडा, तबकडी आणि गोळा यांच्या फेकी यांचा समावेश होतो, ते सर्व प्रकार आपल्याला ठाऊक आहेत. याशिवाय धनुष्याची नेमबाजी, बंदुकीची नेमबाजी,



तसेच सॉफ्टबॉल, बेसबॉल, हॅंडबॉल, फुटबॉल, व्हॉलिबॉल, बास्केटबॉल, टेनिस असे 'चेंडू' असणारे खेळ त्यात समाविष्ट आहेत. तसेच विविध अंतरांच्या आणि पद्धतीच्या



पोहोण्याच्या शर्यती, सूर मारणे, वॉटर पोलो इ. तलावावरचे क्रीडाप्रकार तर, कुस्ती, मुष्टियुद्ध, वेट लिफ्टिंग, ज्युदो, जिमनॅस्टिक्स याशिवाय यार्टिंग, रोइंग, कनूइंग, फेन्सिंग, वगैरे एकूण २६ खेळांचे २७१ प्रकार त्यात समाविष्ट आहेत.


दूरदर्शनवर ऑलिंपिक स्पर्धा पाहताना आपल्याला अनेक खेळ नवे असतील. हॉकी, फुटबॉल, ॲथलॅटिक्स वगैरे खेळ तर आपल्या नेहमीच्या पाहण्यातीलच आहेत. पण यार्टिंग, रोइंग, कनूइंग, फेन्सिंग, पेंटॅथलॉन, इक्वेस्ट्रिअन वगैरे स्पर्धा आपल्याला बऱ्याच अपरिचित वाटतील. म्हणून त्या अधिक चौकसपणे पाहा. समजलं नाही तर ते सोडून देऊ नका. कुणाकडून तरी ते समजावून घ्या. काय पाहिलेत ते लिहून काढा. खेळाबरोबरच खेळाडूंची चिकाटी, जिद्द, लढाऊवृत्ती, जिंकण्याची तीव्र इच्छा याही गुणांबाबत माहिती मिळवा.

❑❑

**– हेमंत जोगदेव**
'इंद्रायणी',
पत्रकारनगर, पुणे १६



प्रायोजक : नातू चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे



# नमस्कार ऑगस्टपुत्रांनो

वि. वा. शिरवाडकर

*देशाचं भवितव्य अखेरत: सामान्य माणसं घडवतात. ४२ चा ऑगस्ट महिना म्हणजे सामान्यांच्या पराक्रमपर्वाचा पहिला अध्याय! एखाद्या उद्दिष्टासाठी समाजातील सामान्यवर्ग जेव्हा पेटतो तेव्हा तो समाज त्या उद्दिष्टाच्या उंबऱ्यापर्यंत पोचू शकतो.*

*'भारत छोडो' आंदोलनाच्या त्या मंतरलेल्या काळातील अतिशय प्रेरणादायी असा एक प्रसंग लेखकाने स्वत: अनुभवला आणि शब्दबद्ध केला. ख्यातनाम मराठी लेखक श्री. वि.वा. शिरवाडकर यांचा 'नमस्कार ऑगस्टपुत्रांनो' हा लेख छात्र प्रबोधनमध्ये पुनर्प्रकाशित करीत आहोत. या देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या त्या ज्ञात-अज्ञात ऑगस्टपुत्रांना आपणही सश्रद्धपणे वंदन करू या!*

सन एकोणीसशे बेचाळीसमधील ऑगस्ट. आधुनिक भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान. रक्ताश्रूंनी भिजलेलं आणि अपार त्यागाच्या आणि पराक्रमाच्या गाथा सांगणारं.

इतिहास घडविणाऱ्या त्या काळात मी मुंबईला होतो हे माझं सद्‌भाग्य. त्या धगधगत्या काळाच्या आठवणी माझ्या स्मृतीवर कोरलेल्या आहेत.

शिलालेखासारख्या!

मी तेव्हा 'धनुर्धारी' या साप्ताहिकात सहसंपादक म्हणून काम करत होतो.

जगाचं भवितव्य ऐरणीवर घालणारं महायुद्ध युरोपात चालू होतं आणि भारताच्या स्वातंत्र्याचा लढा अदम्य वेगानं शेवटच्या तळाकडे झेपावत होता. अशा काळात वृत्तपत्रात असणं हाही एक थरारक अनुभव होता.

इंग्रज सरकार वाटाघाटीच्या मार्गानं चाललेलं होतं आणि देशातील समस्या सुटोत वा न सुटोत, संपूर्ण स्वातंत्र्यासाठी आता आपण एक दिवसही थांबायला तयार नाही अशी भूमिका काँग्रेसनं घेतलेली आहे. मी एका वर्षात देशाला स्वराज्य मिळवून देतो अशी प्रतिज्ञा गांधीजींनी पूर्वी केली होती. वीस-बावीस वर्षांनंतर ते निर्वाणीचं वर्ष आता उगवलं होतं. गांधीजी म्हणाले होते, **''यापुढं थांबणं मला शक्य नाही. आता थांबलो तर जगाच्या अंतापर्यंत थांबावंच लागेल. धोका पत्करूनही लोकांना गुलामगिरीचा प्रतिकार करण्यास सांगावे, असा निर्धार मी केला आहे.''**



श्री. राजेंद्र कानडे यांच्याकडून उत्तमतेकडे वाटचाल करण्यासाठी प्रबोधकांना शुभेच्छा !

सर्व देश या प्रतिज्ञेच्या पाठीशी उभा राहिला होता. राष्ट्रीय एकात्मतेचा अभूतपूर्व साक्षात्कार प्रत्ययाला येत होता. कधी पेटला नव्हता असा देश पेटून उठत होता. **'ज्या जागेवर तुम्ही असाल त्या जागेवरून आणि हातात जे हत्यार असेल त्या हत्यारानं, पारतंत्र्याशी लढा'** हा गांधीजींचा संदेश आम्ही अगोदरच अंमलात आणला होता. तेव्हाचे सारेच पत्रकार लेखणींनं लढत होते आणि अखेरच्या लढ्याला आवश्यक अशी मनोभूमी आपापल्या परिसरात निर्माण करत होते. सैन्याच्या चालीसाठी रस्ते तयार करण्याचं, पूल बांधण्याचं, दगडधोंडे दूर करण्याचं, बिनीवाल्यांचं कार्य ते करत होते. या महायज्ञात दोन समिधा टाकण्याची संधी मलाही लाभली होती. ज्यांनी तो काळ पाहिलेला वा अनुभवलेला नाही, त्यांना त्याची कल्पना येणे प्राय: अशक्यच आहे. नकाशावरील अक्षांश-रेखांशाच्या रेषांप्रमाणे देशाच्या सर्व दिशांतून ज्वालांचे धगधगते प्रवाह वाहत होते आणि आता ते सर्व मुंबईतील गवालिया टँक मैदानाकडे आणि ऑगस्टच्या आठ तारखेकडे झेपावत होते.


जुलैच्या पहिल्या आठवड्यात काँग्रेसच्या वर्किंग कमिटिनं 'चलेजाव'चा ठराव मंजूर करून साम्राज्यसत्तेला अखेरचा इशारा दिला होता. पुढील संग्रामाची सारी सूत्र गांधीजींच्या हाती सुपूर्द केली होती. तेव्हाचे व्हॉईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी सलोख्याचे प्रयत्न केले. काही भविष्यकालीन आश्वासनंही दिली, पण गांधीजींनी ती मानली नाहीत. शांतीच्या सागरातून आता लाव्हाच्या लाटा उसळू लागल्या होत्या. **''ब्रिटिशांची आश्वासनं म्हणजे बुडत्या बँकेवरील पुढील तारखेचे चेक आहेत.''** या शब्दांनी त्यांनी त्या आश्वासनांची संभावना केली. त्यांच्या प्रत्येक उक्तीकडं कोट्यवधी भारतीयांचंच नाही, तर साऱ्या जगाचं लक्ष वेधलं होतं. हाडांच्या सापळ्यासारख्या वाटणाऱ्या त्या कृश देहातून देशाचं सर्व आकाश व्यापणारं एक विराट नरसिंहरूप प्रगट झालं होतं. आठ ऑगस्टच्या पूर्वरात्री त्या नरसिंहरूपानं दोन आदेश राष्ट्राला दिले. एक ब्रिटिशांना- 'भारत छोडो' आणि दुसरा भारतीयांना - जिंका किंवा मरा.'

ते ऐतिहासिक घोषमंत्र ऐकायला मी गवालिया टँकच्या मैदानावर उपस्थित होतो. सात ऑगस्टपासून सुरू झालेल्या काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनात 'भारत छोडो' चा ठराव संमत होणार होता. आठ तारखेला दुपारच्या सत्रात तो शेवटचा ठराव मांडण्यात आला.

ज्या क्षणाची सारा देश 'सर्वस्वाच्या झाल्या श्रुती। सर्वस्वाचे झाले नेत्र ।।'अशा आतुरतेने वाट पाहत होता तो क्षण येऊन ठेपला. मी दुपारी दोन वाजल्यापासून गावलिया टँकच्या मैदानावर तळ ठोकून बसलो होतो. मंडपातील हजारो लोकांमध्ये बसण्याचं भाग्य मला लाभलं नव्हतं. पण बाहेरच्या लाखो जनांच्या गर्दीत समाविष्ट होण्याचं त्याहून मोठं भाग्य मला प्राप्त झालं होतं. मुख्य प्रवेशद्वारापासून मी बराच दूर होतो, पण तेथून तिकडं वारंवार उसळणारी गर्दी मला दिसत होती. पंडित नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद,


श्री. राजेंद्र कानडे यांच्याकडून छात्र प्रबोधनच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा!

राजेंद्र प्रसाद असे मोठमोठे नेते मोटारीतून आत जात होते. जमाव त्यांचा जयजयकार करत होता. थोड्या वेळानं बापूजी आल्याची वार्ता पसरली आणि माझ्या जवळपास असलेले शेकडो लोकही वाऱ्याच्या वेगानं प्रवेशद्वाराकडे धावत सुटले, पण नंतर कळलं, की गांधीजी वेगळ्याचं दारानं आत गेले होते. चारच्या सुमारास ठरावावरील महत्त्वाची भाषण सुरु झाली. ध्वनिक्षेपण उत्तम दर्जाचं होतं. दिवेलागणीपर्यंत मैदानावर दोनतीन लाख माणसं प्राण भरलेल्या पुतळ्यासारखी सचेतन, पण नि:शब्द बसली होती. अंधार पडू लागला आणि हलके हलके गडद होऊ लागला.



काळोखाच्या त्या प्रचंड शामियान्यात मुंबईतील जनशक्ती अखेरची झेप घेण्यापूर्वी एका ज्वालाग्राही शांततेत स्थिरावली होती. पं. जवाहरलाल नेहरूंचं भाषणं झालं. पटेलांचंही झालं. इतर अनेकांची झाली. मंडपातून येणारे शब्द बाहेरच्या काळोखात विजेप्रमाणे लखलखत होते आणि आमच्या कानांत शिरत होते. तरीही तो लक्षावधींचा समूह वाट पाहत होता गांधीजींच्या शब्दांची. त्यांच्या अपौरुषेय वेदवाक्यांची. बापूजींचं भाषण सुरू झालं, तेव्हा बाहेरचा काळोख खूप दाटला होता आणि पावसाच्या सरीही अधूनमधून झिमझिमत होत्या; पण भाषण चालू असेपर्यंत कोणीही जागचं हलत नव्हतं वा शेजाऱ्याशी कुजबुजत नव्हतं. आरोळ्या ठोकण्याची इच्छा असूनही पूर्णत: शब्दहीन झालेला असा जनसमूह मी पूर्वी पाहिला नव्हता. अजूनही पाहिलेला नाही. एक अपूर्व अनुभव होता तो. गांधीजींच्या बोलण्यात आवेश नव्हता. वक्तृत्वाची करामत नव्हती. स्वरांचे चढउतारही नव्हते. नेहरु, पटेलादी वक्त्यांसारखं भारावलेपण वा क्षोभ त्यांच्या भाषणात नव्हता. क्षोभातून उद्भवणारा तो वेगही नव्हता. कार्तिकीच्या रात्री शांत नदीत सोडलेल्या दिव्याप्रमाणे एकेक शब्द संथ गतीनं मंडपाच्या बाहेर येत होता आणि त्या अफाट समुदायातील प्रत्येक माणसाच्या काळजामध्ये घर करत होता. भाषण संपलं तेव्हा मैदानावर लक्षावधी माणसं नव्हती, तर लक्षावधी पेटलेल्या मशाली होत्या.

त्याच रात्रीच्या पहाटसमयी सर्व नेत्यांना



सौ. विद्या करंबेळकर यांच्याकडून प्रबोधकांना कल्पक होण्यासाठी शुभेच्छा!

अटक करण्यात आली. देश निर्नायक झाला.

गांधीजींनी सांगितलं होतं.'**तुम्ही आजपासून स्वतंत्र झाला आहात. त्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी असाल तेथून लढा. तुम्हीच तुमचे नायक आणि नेते आहात.**'

हे आव्हान सामन्यांनी स्वीकारलं.

देशाचं भवितव्य अखेरत: सामान्य माणसंच घडवतात. बेचाळीसचा ऑगस्ट महिना म्हणजे सामान्यांच्या पराक्रमपर्वाचा पहिला अध्याय. सुरुवातीला आयुष्यक्रमात रुतलेली बरीच माणसं टाळ्या वाजवतात. प्रोत्साहन देतात. आर्थिक आणि नैतिक पाठिंबाही देतात. पण प्रत्यक्ष रणांगणात उतरून आपल्या सर्वस्वाची, प्रसंगी प्राणांचीही बाजी लावणारे जमाव, बहुतांशी सामन्यांतूनच पुढे येतात. पराकोटीच्या त्यागाला आणि पराक्रमाला बौद्धिक विचक्षणा पुरी पडत नाही. त्यासाठी भावनात्मक बेहोषी आवश्यक असते. म्हणून एखाद्या उद्दिष्टासाठी समाजातील सामान्यवर्ग जेव्हा पेटतो, तेव्हा तो समाज त्या उद्दिष्टाच्या उंबऱ्यापर्यंत पोचू शकतो.

राष्ट्रीय पातळीवरचेच नाही तर गावपातळीवरचे नेतेही नजरेआड झाले. तुरुंगात गेले होते, नेतृत्व करायला, दिशा दाखवायला कोणीही समोर नव्हतं, पण बापूजींचा आदेश होता. **तुम्हीच तुमचे नेते व्हा.**

हा आदेश देशातील लक्षावधी लोकांनी परमार्थाने मानला आणि आचरणात आणला.

वास्तवार्थानं ज्याला लोकयुद्ध म्हणता येईल असं पारतंत्र्याविरुद्धचं युद्ध देशातील अनेक भागांत सुरू झालं. हिंसाहिंसेचा तात्त्विक विचार अंधुक झाला आणि सामान्यांचे जमाव मिळेल त्या हत्यारानं साम्राज्यसत्तेशी लढू लागले.

याचं एक प्रात्यक्षिक मी गिरगावात पाहिलं. मी एका सुरक्षित सज्जातून पाहत होतो. समोरच्या गल्लीतील कोळशाच्या वखारीत काम करणारी चार-सहा माणसं जगाच्या अर्धाअधिक भाग पादाक्रांत करणाऱ्या ब्रिटिश सत्तेशी हाती येईल त्या हत्यारानं, पण प्राण पणाला लावून लढत होती. एकेक हमाल दगडांचा वर्षाव करत पोलिसांवर चालून येत होता आणि बंदुकीच्या गोळ्यांनी रक्तबंबाळ होऊन मरून पडत होता. अशी चार-पाच माणसं मेल्यावर ती लढाई थांबली.

लढाई थांबली, पण गल्लीच्या नाक्यावर सांडलेलं रक्त भारताच्या साऱ्या नकाशावर पसरलं.

पुढील सहा वर्षं ऑगस्टपुत्रांचा हा आत्मार्पणाचा महायज्ञ जळतच राहिला होता.

म्हणून मला वाटतं, **स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवात व्यासपीठावर गांधी, नेहरू, सुभाष यांच्या तसबिरीशेजारी एक चित्र नसलेली तसबीर असावी. ते चित्र असेल चेहरा नसलेल्या सामान्य माणसाचं- ऑगस्टपुत्राचं!**


**पहिला नमस्कार त्यालाच व्हायला हवा.** ❑❑

**श्री. वि.वा. शिरवाडकर**
तरण तलाव, रा.ब.गोखले मार्ग
टिळकवाडी, नाशिक २.



छात्र प्रबोधनची विविध पुस्तके संग्रही ठेवा, स्थानिक कार्यालयांतून खरेदी करा.

डोळस भटकंती
लेखांक ११ वा



# सर्पसृष्टीची ओळख

– *प्रा.प्र.के.घाणेकर*

*श्रावण महिन्याचं आगमन होतं ते वेगवेगळ्या व्रतवैकल्यांना, सणउत्सवांना सवे घेऊनच! नागपंचमी असाच एक उत्साहानं साजरा केला जाणारा सण! टोपलीत बंद करून ठेवलेले नाग-साप घेऊन गारुडी दारोदारी येतात. नागाची पूजा दूध-लाह्या, पैसे देऊन केली जाते. नागपंचमीची कथा घरोघर वाचली जाते. आजच्या बुद्धिप्रसाराच्या जगात 'पर्यावरण वाचवा'चा नारा आपण ऐकत असतो. प्रचंड प्रमाणात धान्याची नासाडी करणाऱ्या उंदरांचा नाश करून हे सर्प मानव जातीवर उपकारच करित असतात. काहीच सर्प हे विषारी असतात. हे सर्व ज्ञान आपण पाठ्यपुस्तकातून मिळवत असतो. असं असताना हा सण कसा साजरा करावा. याविषयीही पुनर्विचार नक्कीच करायला हवा. नागपंचमीला माणसांनी पकडलेल्या, अर्धमेल्या केलेल्या सापाला लाह्या फुले वाहण्यापेक्षा सर्पविषयीचे ज्ञान मिळवणं, त्याविषयी समाजात जागृती निर्माण करणं म्हणजेच नागपंचमी साजरी करणं ! या निमित्तानं 'डोळस भटकंती' या लेखमालेत प्रा.प्र.के.घाणेकर आपल्याला सर्पसृष्टीची ओळख करून देत आहेत.*

माणसाला काही गोष्टींची उपजतच भीती वाटत असते. एकटेपणा, अंधार, वळवळणारे साप ही त्यातील काही उदाहरणे. साप-नागांबद्दल कुतूहलापेक्षा भितीच जास्त वाटल्याने आणि सर्पदंशामुळे मृत्यू येण्याच्या काळजीने साप दिसला की दगड-विटा-लाठ्या-काठ्या अशा कोणत्याही साधनाने प्रथम त्याला मारायचं, हीच जनरीत आढळते. जणू काही आपण सारेच त्या जनमेजयाचे वंशज!

प्राचीन भारतीय संस्कृतीत मात्र नागसापांना बरंच महत्त्व दिलेलं आढळतं गळ्यात नाग धारण करणारा शंभूमहादेव, शेषशायी असणारा विष्णू, पोटावर नाग गुंडाळणारा श्रीगणेश याचबरोबर कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण या धीट देवतांचं कौतुक करावं तेवढं थोडंच. वर्षात एक दिवसच साजरी होणारी नागपंचमी अन् त्यादिवशी खुद्द नागालाच बहाल केलेलं देवत्व याचाही विचार सरपटणाऱ्यांच्या दुनियेचा विचार करताना करायला हवा.

नागाच्या डोक्यावरचा तेजस्वी मणी, अंगावर लांब केस असणारा संपत्तीरक्षक भुजंग, डूख धरणारा नाग, शिट्टी वाजवणारा नाग, मंत्राने सर्पविष निश्चित उतरते या आणि अशाच अनेक खुळचट अन् अशास्त्रीय कल्पना पिढ्यानूपिढ्या आपल्या मनात ठाणं मांडून बसलेल्या असतात.

सर्पसृष्टीची माहिती करून घ्यायची तर अगदी परिक्षित राहून चालणार नाही. पण विषारी साप बेदरकारपणे हाताळून मृत्यूला



*With Best Compliments From* JAISONS ENGINEERING TECHNOLOGY *PUNE.*


साद घालणं, हेही टाळायला हवं. योग्य ती काळजी घेऊन जाणत्या मंडळींच्या देखरेखीखाली सर्प परिचय करून घ्यायला हरकत नाही. आत्मविश्वास अन् स्वत:बद्दल खात्री नसेल तर सापांची चित्रे पाहावीत, माहिती वाचावी अन् गप्प बसावं.

सापांमध्ये विषारी अन् बिनविषारी असे दोन प्रकार प्रामुख्याने असतात. चावणं हा सापांचा गुणधर्म असतो. मग तो विषारी असो वा बिनविषारी. नाग, फुरसं, मण्यार घोणस हे आपल्याकडे आढळणारे प्रमुख चार विषारी साप आहेत. पण ते काही नेहमी आढळत नाहीत. भारतात आढळणाऱ्या २३६ जातींपैकी एकूण फक्त ५० जाती विषारी आहेत. परंतु सर्पसृष्टी बद्दलच्या अज्ञानामुळेच त्यांची विनाकारण हत्या माणसाकडून होते.

विषारी सापांच्या वरच्या जबड्यात दोन्ही अंगास एकेक विषदंत असतो. ह्या पोकळ नळीसारख्या अणकुचीदार दाताला मागील बाजूस विषग्रंथी असते. एरवी आडवे राहणारे हे विषदंत चावण्याच्या वेळी उभे झालेले असतात. चावताना विषग्रंथीवर दाब पडतो आणि त्यातील विष पोकळ विषदंतातून चाव्यामुळे झालेल्या जखमेत येऊन पडते. विषारी सापांच्या पिलांना जन्मापासूनच विषाचे दात व कार्यक्षम विषग्रंथी असतात. साप धरणारे, गारुडी आणि इरूला जमात साप पकडून त्यांचे खेळ करणे, साप खाणे आदी गोष्टी करतात.

नागपंचमीच्या दिवशी विषदंत काढून टाकणे, विषग्रंथी उपटून टाकणे, नागाचे दोन्ही जबडे भक्कम दोऱ्याने शिवून टाकणे आदी अघोरी प्रकार करतात. नागाला दूध पाजणे हाही एक खुळचटपणाच. नाग दूध पीत नाही. त्याचे ते नैसर्गिक अन्न नाही.


नाग-साप-अजगर प्रामुख्याने भक्ष्याला पकडून गिळून टाकतात. त्यांच्या अंगावरील खवल्यांची नक्षी, रंगाचे पट्टे वा चट्टे यामुळे बहुतेक साप परिसरात लपून जातात. पाय नसतानाही अतिशय चपळ हालचाल बहुतेक साप करू शकतात. काही सापांना पिल्ले होतात तर काही साप अंडी घालतात. साप हे थंड रक्ताचे प्राणी आहेत. त्यामुळे ते गारव्याला राहणे पसंत करतात.



पुण्यात कात्रजजवळ अन् प्राधिकरणात सर्पोद्याने आहेत. मद्रास जवळील सर्पोद्यानही प्रसिद्ध आहे. अनेक प्राणी संग्रहालयांमध्ये जिवंत साप पिंजऱ्यात वा काचपेटीत ठेवलेले आढळतात. शहरी लोकांपेक्षा ग्रामीण



मंदार देवगावकरतर्फे प्रबोधकांना बलसंपन्न व आरोग्यपूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा!



लोकांना सापांबद्दल जास्त माहिती असते. सापांबद्दल अधिक माहिती मिळवताना निसर्गात ते पाहताना, साप हाताळताना अतिशय काळजी घेणे अत्यावश्यकच आहे. खरं तर गैरमाहित - गाराने साप न हाताळणे श्रेयस्कर. ❑❑

**- प्र.के.घाणेकर**
१०५ नारायण पेठ, पुणे

## अधिक माहितीसाठी वाचा.

**आपली सृष्टी, आपले धन -** खंड दुसरा, - मिलिंद वाटवे, विवेक परांजपे, निसर्ग प्रकाशन.
**सापांविषयी**-झाई आणि रॉम व्हिटॅकेर, अनुवाद वसंत शिरवाडकर, प्रकाशन नॅशनल बुक ट्रस्ट
**प्राणीसृष्टी -** भाग १ला-डॉ.म.वि.आपटे, प्रकाशक-महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृतीमंडळ
**भटकंतीतून विज्ञान -** प्रा.प्र.के. घाणेकर, स्नेहल प्रकाशन
**विषारी प्राणी -** वि.मा. ठिगळे, रा.मा.ठिगळे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन
**स्नेक्स ऑफ इंडिया अ‍ॅण्ड पाकिस्तान** - के.जी.घारपुरे पॉप्युलर, बुक डेपो, मुंबई
**कॉमन इंडियन स्नॅक्स-ए फिल्ड गाइड -** रोम्युलस व्हिटॅकर, मॅकमिलन इंडिया लिमिटेड.
**स्नेक्स ऑफ इंडिया** - पी.जे. देवरस, नॅशनल बुक ट्रस्ट

## *विशेष अभिनंदन !*

इ. १० वी व १२ वी मध्ये यशस्वी झालेल्या सर्व सभासदांचे मन:पूर्वक अभिनंदन! छात्र प्रबोधनच्या सभासदांना विशेष यश मिळाले आहे. त्यांचे खास अभिनंदन! अन्य सभासदांनीही आपले यश आम्हाला जरूर कळवावे.

- **कु. दीपाली गोगटे,** सांगली - १२ वी कला शाखेत कोल्हापूर विभागात सर्वप्रथम
- **चि. प्रणव महाजन,** चाळीसगाव - १२ वी शास्त्र शाखेत नाशिक विभागात दहावा.
- **कु. पल्लवी गलगली,** निगडी - १० वी पुणे विभागात सर्वप्रथम
- **चि. निशिकांत निबंधे,** अकोला - १० वी अमरावती विभागात २३ वा.
- **चि. संतोष पाटील,** पुणे - १० वी पुणे विभागात २४ वा.
- **चि. विवेक नवाथे,** वाई - १० वी वाई केंद्रात सर्वप्रथम.

*सर्वांना पुढील शैक्षणिक यशासाठी हार्दिक शुभेच्छा!*



व्हिडिओकॉन व्हि.सी.आर.लि. तर्फे प्रबोधकांना शुभेच्छा!

# आई उगाच का रागावते ?

काल अमितचा वाढदिवस होता. अमित राहुलचा खास मित्र. संध्याकाळी वाढदिवसानिमित्त सगळे मित्र एकत्र जमले होते. गप्पा मारतामारता घड्याळाकडे कुणाचंच लक्ष राहिलं नाही. रात्रीचे ८ वाजले राहूल घरी पोहोचला तर आईचा पारा चढलेला!

'अरे राहुल, उशीर होईल हे सांगून नाही का जायचं? इकडे माझा जीव किती टांगणीला लागला बघ!'

राहुल मनातल्या मनात चरफडला, 'थोडासा उशीर झाला तर काय बिघडलं? **ही आई म्हणजे उगीचच रागावत असते सारखी...!'**

प्रसंग किती साधा, तुमच्या-आमच्या सगळ्यांच्या घरात नेहमी घडणारा. आपण बाहेरच्या विश्वात रमलेले असतो अन् घरात असणारी आपली आई आपल्या काळजीने उशीर झाला की खिडकीशी सतरा फेऱ्या मारत बसते. अशावेळी खरंच का आई उगाचच रागावते? तुम्हीच विचार करा बरं! तिचा राग हा तुमच्याविषयीच्या आत्यंतिक काळजीचाच आविष्कार नसतो का?

आता एखाद्या दिवशी घरी पाहुणे आलेले-आई, बाबांना ऑफिसमधून येताना काही वस्तू घेऊन येण्यास सांगिते.बाबा नेहमीप्रमाणे विसरलेले!ऑफिसमधून दमूनभागून आलेली आई-घरात पसारा-अनंत काम वाट पाहतात-अशावेळी आपला राग, आई राहुलवरच ओरडून व्यक्त करते- 'अरे किती वेळा सांगितलं पसारा आवरायला-आई म्हणजे काय सगळ्यांचा नोकर आहे का घरात? 'राहुलला वाटतं 'आत्ताच तर आलो शाळेतून- जरा म्हणून स्वस्थ बसू देत नाही ही आई.'

एक मात्र खरं, कधीकधी आई अगदी उगाचच सुद्धा रागावते. आई-बाबांचा काहीतरी वादविवाद झालेला-घरातलं वातावरण एकदम तंग-बिच्चाऱ्या राहुलवर आई मग उगाचच रागावते! कधी दमूनभागून आली की घरातला टी.व्ही. चा मोठा आवाज तिचं डोकं उठवतो. नेमका टी.व्ही.वर राहुलच्या आवडीचा कार्यक्रम लागलेला. राहुलला वाटतं-दिवसभरात आता तर टी.व्ही. पाहतोय. आई आपली उगाचच रागावते!

पण राहुल, तूच तर म्हणतोस की, मी आता लहान कुक्कुलं बाळ आहे का? मी मोठा झालो हे आईला कसं समजत नाही? आता तुलाही हे समजायला हवं-'रागावेल आई कधीतरी उगाचच!' पण तिचा ताण समजून घेऊन आपणही थोडं समंजसपणे वागायला हवं बरं का! कधी तिच्या रागामागची कारणं जाणून आपलं वागणंही प्रसंगी बदलायला हवं. तिचं प्रेम, चांगलं वळण लावण्याची तळमळ, तिला गप्प बसू देत नाही.

पण एक गोष्ट मात्र नक्की हं - उशीरा घरी परत आलांस तर डोळ्यात प्राण आणून वाट पाहणारी, जेवणासाठी थांबणारी, आईच असते! कितीही चुका केल्यास ना राहुल, तरी त्या पोटात घालणारी फक्त आईच असते, ही एवढी एक गोष्ट लक्षात ठेवलीस ना की 'उगीचच रागावते' म्हणून तिच्यावर रागावणं तू सोडून देशील! तेव्हाच तू खरा मोठा झालास म्हणायचं!

❑❑

**शैलजा देशमुख**
बी ७-५ गुरुराज सोसायटी, पद्मावती,
पुणे ३७

# वेगळी राखीपौर्णिमा

**सौ. मोहनतारा पाटील, पुणे.**

*११ ऑगस्ट हा ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक - संचालक कै. डॉ. वि.वि. तथा आप्पाजी पेंडसे यांचा स्मरणदिन! 'छात्र प्रबोधन' हे आदरणीय आप्पांनी आम्हा सर्वांना दिलेले एक स्वप्न! आप्पांनी आयुष्यभरात अनेक माणसे जोडली व त्यांना प्रेम दिले. त्याचबरोबर स्फुल्लिंगही! त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा परिचय थोडक्या शब्दांत करून देणं शक्य नाही. त्यांच्या स्मरणदिनाच्या निमित्ताने ही एक छोटीशी आठवण-लेखिकेला प्रेरणा देणारी त्याचबरोबर आपणा सर्वांनाही!*

१९५४-५५ साल. टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन मधील एम.एड.चे वर्ग. आपल्या धीरोदत्त व्यक्तिमत्त्वाने अन् धोतर, शर्ट, टोपी या वेषाने एक विद्यार्थी चटकन नजरेत भरत होता. तो म्हणजेच आप्पा पेंडसे होते. एक धीरगंभीर व अभ्यासू वृत्तीचा विद्यार्थी एवढाच परिचय त्यांचा त्यावेळी झाला.

त्यानंतर जीवनाची वळणं अत्यंत वेगळी झाली. मी व आप्पा वेगवेगळ्या दिशांनी जात होतो. एक दिवस ज्ञान प्रबोधिनीसाठी माझ्या मुलाची निवड झाल्याचं पत्र हाती आलं, अन् मी माझ्या मुलाला ज्ञान प्रबोधिनीत नाव घालण्यासाठी घेऊन गेले. तेथे आप्पांची गाठ पडली.

त्या वर्षीच्या राखी पौर्णिमेला मी आप्पांना माझ्याकडे राखीसाठी आमंत्रण दिलं, अन् आप्पा दरवर्षी माझ्याकडे राखी पौर्णिमेला येत राहिले. पौर्णिमेच्या दिवशी जर त्यांना वेळ मिळाला नाही तर, ते दुसऱ्या दिवशी धावत पळत येऊन जात. ''काल फार वाट पाहिली तुमची,'' असं एकदा मी म्हटलं तेव्हा आप्पा म्हणाले, ''खरं सांगू? कालपासून मी घरी सख्ख्या बहिणीकडेही गेलो नाही. पण तुम्ही रागवाल म्हणून धावत इकडे आलो.'' तेव्हापासून मी आप्पांना सांगून ठेवी,''दोनतीन दिवसांत कधीही या.''



तीन वर्षांपूर्वी राखीला असेच आप्पा आले. फक्त थोड्या फळांच्या फोडी अन् ताक घेतलं, हल्ली प्रकृती बरी नसल्याचे ते म्हणाले. नंतर गप्पा मारत असताना मी आप्पांना म्हणाले, ''आप्पा, देशात जे चाललंय ते पाहून मन फार अस्वस्थ होतंय. काहीच मार्ग नाही का?'' आप्पांचे ते उत्तर अजून माझ्या कानी घुमतंय. ''मार्ग दुसऱ्याकडून कळत नाही, तो स्वत:च शोधावा लागतो ना! सामाजिक स्थितीबद्दल एवढं अस्वस्थ वाटतंय ना? मग जनजागृती करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन त्याच्या मागे लागा.''



कालासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन 'प्रबोधन' चे मिळतो हा विश्वास!

“पण म्हणजे काय करावं?” माझा एक प्रश्न. “संत रामदासांनी कसं काम केलं? त्या भयंकर परिस्थितीत देखील ते जनजागरण करू शकलेच ना?” माझ्या चेहऱ्यावरील प्रश्न पाहून आप्पांनी उत्तर दिलं, “कोण्या ग्रंथाची रचना करा असा त्याचा अर्थ नाही. या संत वचनाच्या आधारे जागोजागी निष्क्रियतेने व तटस्थवृत्तीने जगणाऱ्या आपल्या लहान-थोरांच्या पर्यंत पोहोचून त्यांना कर्तव्य सन्मुख करणं, देशप्रेम शिकवणं हे करता येईल की नाही? तेवढं तरी सुरू करा.”

वर्षभरात मी जे काम केलं असेल ते मी आप्पांना सांगे, शेवटच्या राखीच्या वेळी आप्पा एवढंच म्हणाले, “कोणतंही काम लहान नाही हे खरं, पण अजून फार काम बाकी आहे. अधिक वेगानं काम करा.” बस! अन् राखीला आप्पा येऊच शकले नाहीत. यानंतर महायात्रेला निघालेले आप्पाच दृष्टीस पडले. ज्ञान प्रबोधिनीच्या रूपाने उत्तुंग कार्याची उभारणी करून, त्याकडे स्थितप्रज्ञाच्या वृत्तीने पाठमोरे होऊन आप्पा निघून गेले.

❑❑

# अदृश्य शाई



आपल्या मित्राला एखादा गुप्त संदेश द्यायचा असेल तर या अदृश्य शाईचा उपयोग तुम्ही करू शकाल.

स्वच्छ धुतलेले पेन किंवा नवीन नीब वापरा किंवा काडीला टोक करून तिचाही पेनसारखा उपयोग तुम्ही करू शकाल.

व्हिनेगर किंवा लिंबाचा रस शाईसारखा वापरा. आपला संदेश नीट दिसावा म्हणून थोड्या मोठ्या अक्षरात लिहा. लिहून झालेली अक्षरे वाळली की तुमचा संदेश अदृश्य होईल.

संदेश पुन्हा दृश्य व्हावा असे वाटेल तेव्हा कागद मेणबत्तीच्या ज्योतीजवळ धरा. तुम्ही लिहिलेला संदेश हळूहळू दृश्य होईल.

असे होण्याचे कारण म्हणजे व्हिनेगर किंवा लिंबाचा रस याचा ऑक्सिजनशी संयोग होतो म्हणजेच ऑक्सिडीकरण या प्रक्रियेमुळे फिकट तपकिरी रंगाची अक्षरे दिसू लागतात.

व्हिनेगर किंवा लिंबाचा रस या व्यतिरिक्त कोणता इतर पदार्थ वापरता येईल का? याविषयी विचार करा. प्रयोग करून पाहा व त्याविषयी जरूर पत्राने कळवा.

❑❑



काय वाचावे? हे समजण्यासाठी जरूर वाचा ‘वाचलेच पाहिजे असे काही’ छात्र प्रबोधन प्रकाशन.

कथा शोधकांच्या

# 'बोलका पत्थर रोझेटा स्टोन'

*– निनाद बेडेकर*

कुठल्याही शोधाचा क्षण न् क्षण शोधकाच्या दृष्टीने रोमांचकारी असतो, तर जगाच्या दृष्टीने भविष्यात क्रांती घडवणारा! अशाच काही शोधांच्या साहसपूर्ण कथांचा खजिना आपल्यासाठी घेऊन येत आहेत, श्री. निनाद बेडेकर! या अंकापासून 'कथा शोधकांच्या' ही कथामाला सुरू करताना आनंद होतोय.

इ.सन. १७९९ मध्ये, नेपोलियनच्या फ्रेंच सैन्याला, इजिप्तमधील अल रशीद बंदरात, एक काळा पत्थर मिळाला. पुढच्या पंचवीस वर्षात, १५०० वर्षे अज्ञात असणारी एक लिपी उजेडात आली. खरे तर ती लिपी उजेडात होतीच परंतु कळत नव्हती. या दगडामुळे ते कोडे उलगडले गेले!

त्याचं असं झालं! फ्रेंच सैन्याला इंग्रजी नाविक सेनेचा प्रभाव असह्य झाला होता. सागरात इंग्रज फ्रेंचांना झोडत होते आणि जमिनीवरून तुर्कांचे सतत हल्ले होत होते. ब्रिगेडिअर जनरल बूशार्ड या फ्रेंच अधिकाऱ्याचा मुक्काम ईजिप्तमधील अलरशीद या बंदराजवळ होता. जवळच रशीद हा दुर्गही होता. या दुर्गाचे नाव कालांतराने 'ज्युलियन' असे पडले. तर अल रशीद बंदराचे 'रोझेटा'. रोझेटा या नावाला इतिहासात फार महत्त्व आहे. हे रोझेटा बंदर नील किंवा नाइल नदी भूमध्यसमुद्रात मिळते, तेथेच आहे. बूशार्डने रशीद दुर्गाचें काम काढले होते. मजूर, सैनिक काम करत होते. हे काम सुरू असताना एका मजुराची कुदळ एका दगडावर आदळून एक विचित्र आवाज आला. फावड्याने माती साफ केल्यावर एका काळ्या दगडावरची काही अक्षरे दिसू लागली. अर्थ कळत नसला तरी काहीतरी ऐतिहासिक महत्त्वाची ही वस्तू आहे याची जाणीव सर्वांनाच होती. माती बाजूला करून तो काळा पत्थर बाहेर काढण्यात आला.

अरब आणि फ्रेंच सैनिकांचा गराडा त्या काळ्या दगडाभोवती पडला. प्रत्येक जण आपापले मत व्यक्त करू लागला. बूशार्डच्या कानावर ही बातमी जाताच तो धावतच आला. त्या दगडाचे बारकाईने निरीक्षण केल्यावर त्याला तीन वेगवेगळ्या लिपीतून त्या दगडावर मजकूर कोरलेला आढळला. तळातली ग्रीक लिपी कळत होती, परंतु वरच्या दोन वेगवेगळ्या लिपीतून काय लिहिले आहे हे गौडबंगालच होते.







छात्र प्रबोधन मासिकासाठी जाहिराती मिळवून द्या. दर-अर्धे पान रु. ९००/- पूर्ण पान रु. १,५००/-



दगड बूशार्डच्या घरी हलविण्यात आला.

ग्रीकमधील मजकूर जाणकारांनी वाचल्यावर इ.स.पूर्व १९६ मध्ये इजिप्तचा राजा ५वा टॉलेमी एपिफेनस याच्या गौरवार्थ केलेले लिखाण आढळले. इतिहासावर त्याचा काही वेगळा परिणाम होणार नव्हता. वरील दोन लिपीत काय लिहिले आहे हे कळेना. त्यातील एक ही 'डेमॉटिक' होती तर दुसरी अनाकलनीय अशी 'हायरोग्लिफिक' म्हणजे चित्रलिपी होती. साऱ्या इजिप्तभर या चित्रलिपीतून मजकूर कोरला होता, पण त्याचा अर्थ काही कळत नव्हता. रोझेटाचा दगड ही त्या चित्रलिपीची किल्ली होती; कारण त्यावर वेगवेगळ्या लिपीत समानार्थी मजकूर कोरला होता.

या दगडाचे महत्त्व बूशार्डच्या तसेच इतर अभ्यासकांच्या ध्यानात आले. इजिप्तचा गूढ भूतकाळ समजण्याची एक चावी या दगडामध्ये सामावली आहे, याची जाणीव अभ्यासकांना झाली.

वर्तमानपत्रातून या दगडाला प्रसिद्धी मिळाली. 'आश्चर्यकारक शोध' या मथळ्याखाली बातम्या प्रसृत झाल्या.

रोझेटा पत्थर कैरोला नेण्यात आला. अभ्यासकांसाठी तो खुला करण्यात आला. मजकुराचे ठसे घेण्यात आले आणि ते जाणकारांकडे पाठविण्यात आले. इजिप्तमधील अनेक जुन्या इमारतीतून, पिरॅमीड्स मधील चित्रलिपीतून कोरलेल्या मजकुराचे रहस्य उलगडण्याचा एक मार्ग मोकळा झाला होता. ठसे घेऊन झाल्यावर हा दगड फ्रेंच जनरल जेक्स फ्रान्सवाद मेनू याच्या अलेक्झांड्रियामधील घरात ठेवण्यात आला. फ्रेंचांना या दगडाचे अप्रूप वाटू लागले.

पण फ्रेंचांचे दुर्दैवच त्यांच्या आड आला. इ.सन १८०९ मध्ये इंग्रजांनी इजिप्त वेढले आणि तद्नंतर झालेल्या तहानुसार, गेल्या तीन वर्षात फ्रेंचांनी जमा केलेल्या, इजिप्तमधील सर्व वस्तू इंग्रजांना द्याव्या लागल्या. फ्रेंचांनी 'रोझेटा स्टोन' हा त्यांच्याकडे ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ही जनरल मेनूची खाजगी मालमत्ता आहे असेही दर्शवून पाहिले, परंतु इंग्रज या भूलथापांना बंधले नाहीत. अखेर रोझेटा पत्थराचा ताबा इंग्रजांना देण्यात आला. इंग्रजी सैन्यात जल्लोष झाला. दगडाचा प्रवास सुरू झाला. मोठ्या मानाने हा दगड इंग्लंडमध्ये आणण्यात आला. इंग्रजांचा एका परीने हा जय झाला होता, तरी त्यावरची लिपी उलगडण्याचा मान मात्र एका फ्रेंच अभ्यासकासाठी काळाने आणि इतिहासाने राखून ठेवला होता. या फ्रेंच अभ्यासकाचे नाव होते जां फ्रान्सवा







सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसनाचे पैलू जाणून घेण्यासाठी वाचा 'व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत' ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

शॉम्पोलिआँ!

नेपोलियनने इजिप्तच्या मोहिमेचा आराखडा करण्यासाठी जी सभा बोलावली त्याआधी आठ वर्षे फ्रान्समधील फिगी या शहरातील एका ग्रंथालयाच्या घरी जां फ्रांन्सवाचा जन्म झाला. त्याच्या जन्माआधी त्याची आई गर्भवती असताना तिला झालेल्या आजारांमुळे तिची प्रकृती तोळामासा झाली होती. डॉक्टरांच्या उपायांनी उतार पडत नव्हता. शेवटी त्यांच्याच शेजारी राहत असलेल्या वैद्याच्या उपचाराने आईच्या तब्येतीला उतार पडला. वैदूने एक भविष्यवाणी उच्चारली.

''तुम्हांला मुलगा होईल आणि तो पुढच्या अनेक शतकांना उजाळा देईल.''


वैदूची भविष्यवाणी खरी ठरली. ग्रंथपाल जेकूस शॉम्पोलिआँला मुलगा झाला. मुलाचे नाव जां फ्रान्सवा ठेवण्यात आले. ग्रंथपालाचाच मुलगा असल्याने जां फ्रान्सवा पुस्तकाच्या जगात वाढला. त्याच्या भोवताली निरनिराळी पुस्तके असत. त्याचा थोरला भाऊ जेक्स जोसेफ त्याला ही पुस्तके आणून देत असे. जणू त्या वैदूची भविष्यवाणी खरी करण्याची जबाबदारी जेक्स जोसेफने उचलली.

जेक्सने आपल्या भावाला अनेक भाषा शिकवल्या. जां फ्रान्सवाला निरनिराळ्या भाषा शिकण्यात फार रस होता. तीच त्याची हातोटी होती. फ्रेंचबरोबर लॅटिन आणि ग्रीक भाषाही त्याने आत्मसात केली. ही प्रगती पाहिल्यावर जांला अरबी, सिरियन आणि खाल्डियन शिकण्याची परवानगी मिळाली. जेक्स जोसेफ एकदा घरी आला असता त्याने हिरोडोटस्, स्ट्रॅबो, डायोडोटरस सिक्युलस, प्लिनी आणि प्लूटार्क यांच्या ग्रंथातील जुन्या इजिप्तबद्दल लिहिलेली अनेक पाने फाडून जां फ्रान्सवा ती मुखोद्‌गत करीत असलेला आढळला.

जां फ्रान्सवाने इजिप्तबद्दल भरपूर माहिती मिळविली होती. इजिप्तच्या कॉप्टिक या भाषेचे ज्ञानही त्याने मिळवले होते. हे ज्ञान एक दिवस आपल्याला जगात प्रसिद्धी मिळवून देणार आहे, हे त्याला माहीत नव्हते.

एक दिवस रोझेटा स्टोनची माहिती देणारे वर्तमानपत्र जेक्स जोसेफच्या हाती








बुद्धिमत्ता चाचण्यांसाठी भेटा अथवा लिहा - प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

लागले. तातडीने त्याने ते आपल्या भावाच्या हातात सुपूर्द केले.

रोझेटा स्टोनच्या अनाकलनीय चित्र-लिपीवर अनेकांनी संशोधन सुरु केले होते. पत्थर इंग्रजांच्या आधीन असल्याने इंग्रजी अभ्यासक चारसहा पायऱ्या पुढे गेले होते. यातच एक होता थॉमस यंग. थॉमस यंगने हायरोग्लिफिकवर एक निबंधही वाचला होता.




इ.सन १८०८ साली रोझेटा स्टोनच्या मजकुराची नक्कल जां फ्रान्सवाच्या हाती आली. तहानभूक विसरून जां ती चित्रलिपी अगूढ करावयाच्या मागे लागला. माणसाची जिद्द, मेहनत किती असते याचे हे प्रतीक आहे. या चित्रलिपीचा संकेत भंग करण्यासाठी जां फ्रान्सवाला कोणी अमिष दिले नव्हते. धनाच्या राशी घेऊन कोणी त्याच्या दाराशी उभे नव्हते. कोणती सरदारी मिळणार नव्हती. निरपेक्ष भावनेने जां फ्रान्सवा दिवस-रात्र खपत होता. इजिप्तचा अभ्यास त्याच्या उपयोगी येत होता. गुलामासारखा तो राबत होता. इजिप्तमध्ये देशभर कोरलेल्या या चित्रलिपीचे अनेक नमुने त्याने जमवले होते. फिली येथील स्तंभावरील मजकुराचे ठसेही जां फान्सवाच्या हाती आले होते. तो कोष्टके मांडत होता. ध्वनि, उच्चार यांवरून काही प्रकाश पडतो का ते पाहत होता. तोपर्यंत त्याने हिब्रू भाषेचाही अभ्यास केला होता. हायरोग्लिफिक सारख्याच हाइरॅटिकचा अभ्यास तो करत होता.

इ.सन १८२२ च्या जानेवारी महिन्यात फिलीच्या स्तंभावरील चित्रलिपीचे ठसे फ्रान्सवाच्या हाती आले. फिलीच्या 'कार्टूश' च्या, चौकटीतल्या मजकुराच्या ठश्याकडे पाहिल्यावर जां फ्रान्सवा अत्यंत आश्चर्यचकित झाला. त्याचा अभ्यास फळाला आला होता. रोझेटाच्या दगडावरची सांकेतिक भाषा त्याला कळली होती. राणी क्लिओपात्राचे नाव त्या चौकटीत लिहिले होते.

टॉलेमी आणि क्लिओपात्राच्या 'कार्टूश' नी जां फ्रान्सवाला हायरोग्लिफिकची बारा अक्षरे दिली. जां झटून कामाला लागला. सांकेतिक लिपी पूर्ण अवगत होण्याच्या शेवटच्या पायरीवर तो आला होता. जां ने अनेक 'कार्टूश' जमवले. लिपी वाचता यायला लागल्यावर त्याचा आनंद द्विगुणित झाला. दगडांमध्ये कोरलेले अलेक्झांडर, ऑटोक्रेटर, टायबेरियस, जर्मनिकस, डॉमिशियन, ट्रेजन त्याच्याशी बोलू लागले. पत्थरच बोलू लागले.

जां फ्रान्सवा अक्षरे जुळवू लागला. पहिले चिन्ह इजिप्शियन देवाचे





आधुनिक काळात अर्थपूर्ण संस्कार होण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रकाशित पोथ्या वापरा.

होते. 'रे' हे त्याचे नाव. र... म... आणि पुढची सारखी दिसणारी स...स.... ? स असेल ? असला तर र-म-स-स म्हणजे रॅमसस! इजिप्तचा अतिशय थोर राजा. हो. रॅमससच आहे हे नाव! जां फ्रान्सवाचा आनंद गगनात मावेना. घाईघाईने त्याने दुसरा कार्टूश काढला.

आयबिसचे चित्र म्हणजे इजिप्शियन देवता थॉतचे चिह्न. मग थॉत-म-स थॉतमस! थॉतमॉसिस! अगदी आश्चर्यकारक आणि अगदी सोपे. इजिप्तच्या फेरॉतील एक मोठा राजा. कोडी सुटावयास लागली.

१५०० वर्षे अंधारात असलेल्या चित्रलिपीचे गूढ उलगडले होते. दगड बोलू लागले होते. उराशी धरलेली ठेव खोलू लागले होते. जां फ्रान्सवाने मोठ्या कष्टाने गेली चौदा वर्षे धरलेले स्वप्न पूर्णत्वास आले होते. इजिप्तच्या सांकेतिक लिपीचे रहस्य जां फ्रान्सवाला उलगडले होते. इंग्रजांनी रोझेटा स्टोन पळवला तरी बाजी मात्र एका फ्रेंच अभ्यासकाने मारली होती. रोझेटा स्टोनमुळे इजिप्तच्या वेगळ्या विश्वाचे कवाड खोलले होते. जां फ्रान्सवा नजर न हलवता त्या कार्टूशकडे, चित्रलिपीकडे पाहत होता. त्याच्या डोळ्यासमोर इजिप्तचा इतिहास उलगडत होता.

चित्रलिपीचा संकेत उलगडणारे कागद हातात घेऊन जां फ्रान्सवा त्याचा भाऊ जेक्स जोसेफ काम करत असलेल्या इन्स्टिट्यूटमध्ये धावला. धापा टाकत त्याने भावाला सांगितले.

'कळली, चित्रलिपी कळली! आता ते रहस्य राहिले नाही.'

जेक्स जोसेफने थरथरत्या हाताने कागद उचलले. भावाला मिठी मारली. अत्यानंदाने, थकल्याने जां फ्रान्सवा बेशुद्ध झाला.

२७ सप्टेंबर १८२२ ला जां फ्रान्सवाने आपला शोधनिबंध प्रकाशित केला. सारे जग या शोधाने स्तंभित झाले. इंग्रज अभ्यासकांनी 'हे आम्ही आधीच सांगितले होते' असा कांगावा केला. परंतु तज्ज्ञांनी त्यांचे म्हणणे फेटाळून लावले. जां फ्रान्सवाच्या शोधाला मान्यता मिळाली. ते कागद घेऊन लोक इजिप्तकडे धावू लागले. चित्रलिपी वाचू लागले. आनंदाने थरथरू लागले. जां फ्रान्सवा शॉम्पोलिआँ अजरामर झाला.

ज्या रोझेटा स्टोनने जां फ्रान्सवाला चित्रलिपीचा संकेत सोडविण्याची गती दिली तो बोलका पत्थर मात्र त्याने शेवटपर्यंत पाहिला नाही!... ❑❑

**निनाद बेडेकर**
११०५/१४ स्वानंद ५,
हरिकृष्ण मंदिर पथ, पुणे ४११०१६.







रु. २५०/-देणगी देऊन वाढदिवसानिमित्त आपल्या नावाने छात्र प्रबोधनमधील एक पान प्रायोजित करा.

## घन गर्जत आले......

*– सुहासिनी अ. देशपांडे*



काळे काळे घन गोळा झाले
क्षणात नभ झाकोळून आले.
शतशुंडांतून सहस्त्र धारा
स्नान धरित्रिला घालून गेले.
धडाड धुम धुम धडाड धुम....
घन गर्जत आले, ओले ओले ।।१।।



उभे आडवे शिव–ताण्डव नर्तन
क्षणिक दीप्तीचे होते दर्शन
लख लख फिरतो त्रिशूळ वेगे
कोसळते की चक्र सुदर्शन....!
कडाड कडम् धुम् धडाड धुम्.....
मेघासंगे विद्युत खेळे, बोले
घन, गर्जत आले, ओले ओले ।।२।।



बेभान बरसणे आभाळाचे
मातीचे उन्मुक्त समर्पण
हिरव्या अंकुरल्या स्वप्नांतून
सुरावली सृजनाची सरगम!
छुम् छुम् छननन छुम् छुम्छन
पागोळ्यातून रुणझुण बोले,
घन गर्जत आले, आले ओले ।।३।।

## वर्ष ४ अंक १० मधील प्रश्नांची उत्तरे – तुम्हांला माहीत आहे का?

प्र.१ आब्याला फक्त वसंतातच मोहर का येतो? इतर कोणकोणत्या झाडांना फक्त वसंतात फुले येतात? वसंतात फुलण्यामध्ये झाडांना काय फायदा असतो?

उत्तर : काजू, आंबा यांसारख्या झाडांना वसंतात फुलं येतात. त्याची पुढे कारणे दिली आहेत – अ) झाडावरती सूर्यप्रकाश किती वेळ पडतो त्यावर ते झाड कधी फूल देणार हे अवलंबून असतं. वसंतात फुलणारी झाडं ही Short day plant आहेत. म्हणून दिवस छोटा असताना त्यांना फुलं येतात.

आ) वसंत ऋतुत पावसाळा संपून चार महिने झालेले असतात. त्यामुळे त्याकाळात झाडांना पाणी कमी मिळते. एकूणच सजीवांना जगण्याची जबरदस्त इच्छा असते. वसंत ऋतुत पाणी कमी मिळाल्यानं झाडांना जगण्यामध्ये ताण निर्माण होतो. वंश सातत्य टिकिवण्यासाठी फुलं येतात.

इ) नोव्हेंबर ते फेब्रुवारी चार महिने थंडी असते. आंब्यासारख्या झाडांना कमी उष्णतेतून (थंडीतून) तापमान जेव्हा वाढायला लागते त्यावेळी फुलं येतात. वसंत ऋतुत असे पोषक हवामान असल्यामुळे, आंब्याला मोहर येतो.

ई) वसंतात जी झाडं फुलतात त्या फुलांचे परागीभवन करणाऱ्या कीटकांची जीवनावस्था फक्त त्याच काळात कृतीरूप (Active) असे. बहुतेक सर्वच फुलांच्याबाबत हे परस्परावलंबन असतं.

प्र.२. आळूची भाजी खाताना काही वेळा घसा खवखवतो, असे का होते? घसा खवखवू नये म्हणून या भाजीत काय घालतात? त्याचा नेमका काय परिणाम होतो?

उत्तर : आळूची भाजी जेथे लावली जाते तेथे कॅल्शियम जास्त असते. त्यामुळे आळूच्या पानांमध्ये कॅल्शियम ऑक्झलेट सुईसारख्या लांब आकाराच्या स्फटीक रूपात असतं. भाजी चावताना हे स्फटीक तुटतात. अन्ननलिकेला आतून ओरखडा ओढला जातो. त्यामुळे घसा खवखवतो. टॅट्रिक ॲसिडमध्ये कॅल्शिअम ऑक्झलेट विरघळते म्हणून आळूची भाजी करताना चिंच, ताक, आंबटचुका घालतात.



विविध रोगांवर गुणकारी 'प्रबोधन सूक्ष्मौषधि' वापरा. संपर्क 'आयुर्वेद संशोधिका', ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

# वाळवी आणि दीप

(पान क्र. १२ वरून पुढे चालू)

खाली उतरून रिसेप्शन डेस्कपाशी गेलो.

मी त्याच्याजवळ गेलो तेव्हा सर्वांच्या नजरा माझ्याकडे रोखलेल्या होत्या. मला पाहिल्याबरोबर त्याने उठून उभं राहून दोन्ही हात जोडून मला नमस्कार केला.

''तुम्ही इकडे का आलात? माझा नाव-पत्ता तुम्हाला कोणी दिला?'' मी जरा रागातच विचारले.

''क्षमा करा साहेब, कोणीही दिला नाही. त्या दिवशी तुमच्या हातात असलेल्या ब्रीफकेसवर तुमचं नाव-पत्ता असलेलं कार्ड पाहिलं होतं.''

''आय सी... पाहिलेलं आठवतंय होय? आता काय हवंय? एकदा चुकून दया दाखवून दिलेले अकरा रुपये गोड लागले का?''

''नाही, साहेब! त्या पैशाचे ऋण मी विसरलो नाही. कधीतरी मी ते परत करीन. आता मी पैशासाठी आलो नाही. तरी तुमची मदत हवी आहे.''

''मदत?''

''हो साहेब, मी त्या दिवशी पुस्तकाच्या ढिगाला वाळवी लागली असे म्हणालो होतो ना? माझी नोकरी गेली... आता...''

''आता काय?''

''साहेब उपजीविकेसाठी नोकरी. फक्त माझ्यासाठी नव्हे तर माझ्यावर अवलंबून असलेल्यांसाठी. कोणत्याही प्रकारचे काम मला चालेल. चपरासी, ऑफिस बॉय, लिफ्टमन... असली एखादी नोकरी मिळवून दिलीत तर माझ्यावर फार उपकार होतील.''

''क्षमा करा.'' मी म्हणालो, ''मी तुम्हांला दहा रुपये दिले तेव्हा ते परत येतील ह्या अपेक्षेने मुळीच दिले नव्हते. तुमच्या गरिबीबद्दल वाटलेल्या करुणेने दिले होते; ते मला परत नकोत. परंतु ह्या सभ्य वातावरणात तुम्ही कधीही पाऊल ठेवता कामा नये. तुमची ओळख आहे, असे सांगण्याचीसुद्धा माझी इच्छा नाही. इथे कोणतीही नोकरी नाही. जरी असती तरी मी ती तुम्हांला मिळवून देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.... निघा आता तुम्ही.'' सडेतोडपणे बोलून मी माझे तोंड फिरविले.

कसले दुकान? खरेच नोकरी गेली आहे, की तेही नाटक आहे कोणास ठाऊक? ही सारी धडपड कसल्या घाणेरड्या जीवनाला झाकण्यासाठी आहे हे कसे समजणार?

ह्या माणसाच्या आश्रयात जगणारी माणसं.... बायको, मुलं....

सारंच किळसवाणे..

त्या दिवशी संध्याकाळी घरी परतल्यावर शांताला त्या माणसाची हकीकत सांगितली. ऐकून ती हसत हसत म्हणाली, ''अहो मग त्याच्याकडून काही तरी आणायचं की, तुम्ही तर फारच

भोळे आहात बुवा...'' शांताचे बोलणे ऐकून मला नवल वाटले, गंमतही वाटली, काही झाले तरी तो आता मला भेटायला येणार नाही ह्याची खात्री होती. इथे त्याच्या परिचयाचा अध्याय संपायला हवा. गोष्टही संपायला हवी.

परंतु....

एक महिन्यानंतर एका सुटीच्या दिवशी मी घरीच होतो. दुपारच्या वेळी दारावरची घंटा वाजली. मी दार उघडले तर दारात एक अपरिचित ख्रिश्चन धर्मगुरू उभा होता.

''राव तुम्हीच ना?'' त्याने विचारले.

''हो, आत या ना.'' मी त्यांना आत बोलावले. आत येऊन ते हॉलमधील एका खुर्चीवर बसले.

''मला पाहून आश्चर्य वाटलं का? मी फादर सिल्वेरा. बांद्रयाहून आलोय. एक दु:खद बातमी तुम्हांला सांगावी लागतीय.'' ते संथ आवाजात बोलत होते.

मला आश्चर्य वाटले. माझा त्यांचा परिचय नसताना, ते कोणतीच दु:खद बातमी मला सांगणे शक्य नव्हते. ''काय?'' माझ्या आवाजातील साशंकता शक्य तितकी लपवत मी विचारले.

त्याने खिशातून अकरा रुपये काढून माझ्यासमोरच्या टेबलावर ठेवले.

''तुमचे व आमचे मित्र असलेले शंकर मोरे परवा वारले. आपल्या आवडीच्या क्षेत्रात देवाची सेवा करतच ते वारले.''

''शंकर मोरे!'' मी आश्चर्याने म्हणालो. ''मी हे नाव ऐकलेले नाही!''

''त्यांच्या डायरीत तुमचे नाव होते, मिस्टर राव; तुम्हांला देण्याच्या पैश्याचाही उल्लेख होता. तुम्ही नाव विसरला असाल, मि. राव. बांद्र्याच्या आजूबाजूच्या सर्व कुष्ठरोग्यांना त्यांचा परिचय आहे, मिस्टर राव.... तुम्हांला माहीतच आहे, तो एक देवमाणूस होता. अकरा रुपये तुम्हांला देणे आहे, असे लिहून ठेवले होते. तुमच्या ऑफिसमधून मी तुमचा घरचा पत्ता घेतला. खरोखरच देवमाणूस.... आमच्या 'पारिश' ला नेहमी येत असे. बांद्र्यातील आमच्या सॅनिटोरिअमला न चुकता नियमितपणे येऊन, आपल्या फावल्या वेळात कुष्ठरोग्यांची सेवा करत असे. तेच त्यांचे कुटुंब. त्यांच्या जखमा धुण्याचे, ड्रेसिंग काढण्याचे, घाण काढण्याचे काम म्हणजे त्यांना देवाचे काम वाटायचे. परवा बांद्र्यातील रेल्वेलाईन जवळच्या एका गरीब कुटुंबाला भेटायला गेले होते. तेथले एक मूल रेल्वेलाईनजवळ खेळत होते. लांबून येणाऱ्या गाडीकडे मोऱ्यांचे लक्ष गेले; त्या मुलाला वाचविण्यासाठी ते धावले. गाडीखाली पडून... ओ! गॉड ब्लेस हिम, गॉड ब्लेस....''

❑❑

**सौ. मीना वांगीकर**
'सरस्वती', १२०४/२८,
डेक्कन जिमखाना, पुणे ४.



# पाऊले चालती पंढरीची वाट....

*डॉ.प्र.न.जोशी*

वारकरी पंथाची भक्तिगंगा ही महाराष्ट्रात गेली सातशे वर्षे इथल्या जनमनातून वाहते आहे. पंढरीचा श्रीविठ्ठल हा ह्या पंथाचा देव आणि चंद्रभागेचे वाळवंट हा स्वर्ग. आषाढीच्या निमित्ताने ह्या भक्तिगंगेच्या सातशे वर्षांच्या वारीचा हा मागोवा.

---

वारकरी पंथ हा एक महत्त्वाचा व सर्व जाती-जमातींना समाविष्ट करून घेणारा पंथ आहे. पंढरपूरचा विठ्ठल हे या पंथाचे दैवत आहे. चंद्रभागेत स्नान, विठ्ठलाचे दर्शन व संतसमागम यांसाठी आजही लक्षावधी लोग महाराष्ट्रातल्या अनेक ठिकाणाहून पंढरीच्या वारीस जातात. त्यांना या बाबींसाठी आमंत्रण लागत नाही. ते रजा मिळवितात व वारीत सामील होतात. भजन, कीर्तन, नामस्मरण, यांच्या नादात अनेक दिंड्यांतून वारकरी तल्लीन होऊन नाचतात. त्यांचे हे सुख पाहून स्वर्गाचे देवही यावेळी भूतलावर येतात. पंढरीची आषाढी व कार्तिकी वारी करणारा तो वारकरी. त्यांचा हा पंथ म्हणजे, वारकरी संप्रदाय.

वारकरी पंथाचा इतिहास तसा फार जुना आहे. तेराव्या शतकातील ज्ञानेश्वर, नामदेव यांच्या काळात. या संप्रदायास ज्ञानेश्वरीमुळे तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले व हा संप्रदाय वाढतच गेला. निरनिराळ्या सत्पुरुषांच्या गावांवरून त्यांच्या पालख्या व दिंड्या निघतात. ही वारी मुख्यत: पायी करावयाची असते. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की, 'माझ्या जीवींची आवडी । पंढरपुरी नेईन गुढी ।' यावरून ज्ञानेश्वरांच्या काळीही वारीची पद्धत होती. अपेगाव येथे ज्ञानेश्वरांच्या घराण्यात त्यांच्या पणजोबांपासून विठ्ठलभक्ती होती. ज्ञानेश्वरांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत व मातेचे नाव रुक्मिणी असे होते. या मातापित्यांचा उल्लेख ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगातून 'बापरखुमादेवीवरू' या मुद्रेने केला आहे. सर्व जगाचा पिता व माता विठोबारखुमाई असेही ज्ञानेश्वरांना म्हणावयाचे असेल.

वारकरीपंथ व त्यांची विठ्ठलाची उपासना अनेक शतकांपासून चालू आहे. महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रांतात पंढरीच्या विठ्ठलाची उपासना सुरू होती. पांडुरंग हा समचरणी आहे. याचा एक पाय महाराष्ट्रात व दुसरा कर्नाटकात आहे. म्हणून मराठी संत विठ्ठलाला 'कानडा विठ्ठल म्हणतात व कर्नाटकातील संत पुरंदरदास स्वत:स पुरंदरविठ्ठल असे म्हणवून घेतात.



आकाशातील ताऱ्यांशी दोस्ती करण्यासाठी वाचा 'छंद आकाश दर्शनाचा' छात्र प्रबोधन प्रकाशन

वारकरी पंथाचा इतिहास देताना अतिसंक्षेपाने तुकोबांची शिष्या बहिणाबाईने म्हटले आहे की,

***संतकृपा झाली। इमारत फळा आली।।***
***ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया।।***
***नामा तयाचा किंकर। तेणें केला हा विस्तार।।***
***जनार्दनीं एकनाथ। खांब दिला भागवत।।***
***तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।***
***बहेणि फडकती ध्वजा। निरोपण केले वोजा।।***

या अभंगात संतकृपेने वारकरी पंथाची इमारत पूर्ण झाली, असे म्हटले आहे. या इमारतीचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला व भागवतधर्माचे मंदिर उभे केले. त्यांच्याच काळातील नामदेव यांनी, ज्ञानेश्वरादी संतांबरोबर 'उत्तर हिंदुस्थानातील तीर्थयात्रा' केली. नामदेव तर पुढे अनेकदा उत्तर भारतात गेले होते. तेथे त्यांना फार मान असे. शीखांच्या ग्रंथसाहेबात महाराष्ट्रीय नामदेवांची अनेक पदे आहेत. नामदेवांनी कित्येक पदे हिंदी भाषेत लिहिली आहेत. यावरून वारकरी पंथाचा विस्तार नामदेवांनी केला असे स्पष्ट होते. पुढे पेशव्यांनी व मराठ्यांनी तलवार गाजवून आपला अम्मल उत्तर हिंदुस्थानात बसविला होता. पण याही आधी मराठी संतांनी भगवद्भक्तीची बीजे पेरून तेथील भूमी अधिकच सकस व समृद्ध केली होती.



पुढे दोन शतकांतच परचक्र महाराष्ट्रावर आले. एका अगदी नव्या संस्कृतीचा प्रभाव पडला. हिंदूधर्म, देव, दैवते, मंदिरे, स्त्रियांची अब्रू यांना धोक्याचा काळ आला. जिकडे-तिकडे अस्मानी सुलतानी माजली होती. साधुसंतांचा मार्ग वा वारकरी पंथ लोकांच्या विस्मरणात गेला होता. अशाप्रसंगी पैठण क्षेत्रीच्या एकनाथांना ज्ञानेश्वरांनी प्रेरणा दिली. एकनाथ आळंदीस आले. त्यांनी नजरेआड झालेली ज्ञानेश्वरांची समाधी शोधून काढली. त्याठिकाणी ठेविलेला ज्ञानेश्वरी ग्रंथ उपलब्ध करून घेतला. एकनाथांनी ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रती मिळविल्या व ज्ञानेश्वरी शुद्ध करून लोकांच्या हाती दिली. आज वारकऱ्यांच्या हातात असलेली ज्ञानेश्वरी एकनाथांनी शुद्ध केलेली आहे. एकनाथांचे हे फार मोठे कार्य मानावे लागेल.





अभ्यासाची विविध तंत्रे समजून घेण्यासाठी वाचा 'वेध यशाचा' छात्र प्रबोधन प्रकाशन

शिवाय एकनाथांनी भागवतावर टीका लिहून वारकरी पंथास आधारस्तंभ दिला. भावार्थ रामायण, अनेक पदे व अभंग आणि भारूडे देऊन एकनाथांनी वारकरी पंथास फार मोठी देणगी दिली आहे. एकनाथांनंतर लगेच देहू क्षेत्री तुकाराम महाराजांचा अवतार झाला. अगदी सोप्या भाषेत व अनुभूतिपूर्ण वाणीने तुकारामांनी हजारो अभंग लिहिले. ते अभंग वारकऱ्यांना अत्यंत प्रिय आहेत. आजही 'सुंदर ते ध्यान' या अभंगाने वारकऱ्यांचे कीर्तन सुरू होते. तुकोबांचे शिष्य निळोबाराय व शिष्या बहिणाबाई यांचाही अधिकार फार मोठा होता.

अर्वाचिन काळात ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या मार्गाचा प्रचार अनेक श्रेष्ठ पुरुषांनी केला. केशवराव देशमुख, मल्लापा वासकर, बंकटस्वामी, विष्णुबुवा जोग, साखरे, मामासाहेब दांडेकर, पांगारकर, सातारकर इत्यादी थोर सत्पुरुषांनी वारकरीपंथाची नीट, शिस्तबद्ध बांधणी केली. पंढरीच्या वारीचा महिमा वाढविला.

वारकरी पंथातील अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. पहिले म्हणजे **हा पंथ सर्व जातीजमातींचा बनलेला आहे**. चोखामेळा, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावतामाळी, सेना न्हावी असे विविध संत नाना जातींत निर्माण झाले. एकदा विठ्ठल प्रेमात गोवले गेले की जात संपते. असा या पंथाचा सिद्धांत आहे.

**'या रे लहानथोर।**
**याती भलते नारी नर।'**

अशी या पंथाची धारणा आहे. 'जाती व्यक्ती पडें बिंदुलें' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

या पंथाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, **व्यर्थ कर्मकांड, यज्ञयागादी क्रिया, व्रतवैकल्ये, सोवळे, ओवळे अशा कर्मठ वृत्तींना येथे स्थान नाही**. फक्त प्रभूचे प्रेममय स्मरण, कीर्तन, भजन, ज्ञानेश्वरीवाचन, पंढरीची वारी अशा गोष्टींनाच महत्त्व या पंथात आहे. एका विठ्ठलाखेरीज व पंढरीशिवाय वारकऱ्यांना दुसरी दैवते माहीत नाहीत.

इतर मार्ग स्वर्गकामी वा मोक्षमार्गी आहेत. वारकरी लोक स्वर्गाला दूर लोटतात व मोक्षाला तुच्छ मानतात. वारंवार मनुष्यजन्म यावा व प्रभुप्रेमात रंगून जावे. एवढीच वारकऱ्यांची इच्छा असते.

वारकऱ्यांचा विठ्ठल हा प्रेमळ आहे. 'पंढीरीचा देव बहुत कोवळा' असे संतांनी म्हटले आहे. तो कधी रागवत नाही. शाप देत नाही. तर आईच्या मायेने सर्व लेकरांना आपल्या प्रेमाच्या उबेत घेतो. या देवाच्या शोधासाठी घरदार सोडावे लागत नाही. प्रपंचाचा त्याग करावा लागत नाही.

**'नलगे सायास जाणे वनांतरां।**
**सुखे येतो घरां नारायण ।'**

अशी वारकऱ्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच ते विठ्ठलाला 'विठाई' व ज्ञानेश्वरांना 'माऊली' म्हणून मानतात व त्यांच्या प्रेमात रंगून आपला संसार सुखाने करतात.

❑❑

**डॉ. प्र.न.जोशी**
३, सामदा सोसायटी, केतकर पथ, पुणे ४.



प्रकल्प करण्यासाठी जरूर वाचा 'नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत?' ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.

# रिमोट कंट्रोल म्हणजे काय?

रिमोट कंट्रोल म्हणजे दूरस्थ नियंत्रण! प्रचंड विद्युतदाबाखालील प्रक्रिया, उच्च तापमानाला घडणाऱ्या किंवा विषारी रासायनिक प्रक्रिया वा किरणोत्सारी प्रक्रिया यासारख्या ठिकाणी प्राणास धोका वा शरीरास अपाय संभवतो. म्हणून माणसाचा प्रत्यक्ष संपर्क येऊ न देता नियंत्रण करणे आवश्यक ठरते. अशावेळी दूरस्थ नियंत्रणाचा वापर करतात. त्याचप्रमाणे काही वेळा सोय किंवा चैन म्हणूनही बसल्या जागेवरून एखादी गोष्ट करण्यासाठी (उदा.टी.व्ही. किंवा व्ही.सी.आर. च्या बटणांची ॲडजस्टमेंट!) दूरस्थ नियंत्रणाचा वापर करतात.

दूरस्थ नियंत्रणामध्ये मुख्य प्रक्रिया व तिची नियंत्रक संस्था एकमेकांपासून दूर असतात. दूरस्थ नियंत्रण दोन प्रकारे केले जाते. एका प्रकारात प्रक्रिया व नियंत्रक हे एकमेकांशी जोडलेले असतात. नियंत्रक संदेश विद्युत् स्वरूपात असल्यास विद्युत्वाहक तारांद्वारे किंवा प्रकाशरूपाने असल्यास प्रकाशीय तंतूद्वारे प्रक्षेपित केला जातो. गुंतागुंतीच्या प्रक्रियांमध्ये असे नियंत्रण केले जाते.

दुसऱ्या प्रकारामध्ये प्रक्रिया व नियंत्रण हे अशाप्रकारे तारांनी जोडलेले नसतात. याचे परिचित उदाहरण म्हणजे टेलिव्हिजनचा रिमोट कंट्रोलर. नियंत्रकात अवरक्त (इन्फ्रारेड) किरण प्रक्षेपक बसवलेले असतात. टी.व्ही.च्या समोरील भागात बसवलेले अवरक्त ग्राहक हे नियंत्रण संदेश ग्रहण करून त्यांची संगती लावतात.

ग्राहक व प्रक्षेपक यामध्ये एकास एक अशी संगती राखण्यासाठी पल्स कोड मॉड्युलेशन (पी.सी.एम.) चा वापर करतात. उदा. आवाजाची तीव्रता कमी करण्यासाठी असलेले बटण दाबल्यास एक विशिष्ट सांकेतिक संदेश नियंत्रकाकडून पाठवला जातो. ग्राहकात या संदेशाचा अर्थ लावून त्यानुसार तीव्रता कमी किंवा जास्त करण्यासाठी दोन वेगवेगळे संकेत ठेवलेले असतात. त्यामुळेच दोन वेगवेगळी बटणे नियंत्रकात आढळतात. काही नियंत्रकात मात्र गोल फिरणाऱ्या एकाच बटणाने दोन्ही कामे केली जातात. अवरक्त किरण शरीरातून किंवा पदार्थातून आरपार किरण शरीरातून किंवा पदार्थातून आरपार जाऊ शकत नाहीत. म्हणून असा रिमोट कंट्रोलर वापरताना मध्ये काहीही अडथळा येता कामा नये. अन्यथा नियंत्रक निष्प्रभ होतो.

रेडिओ लहरींचा वापर करूनही दूरस्थ नियंत्रण याप्रमाणे संकेत जातो. तसेच नियंत्रकाकडून ज्याप्रमाणे संकेत जातो. तसेच नियंत्रकाकडेही घडणाऱ्या गोष्टींची माहिती देणारे संकेत येऊ शकतात. साध्या टी.व्ही.च्या रिमोट कंट्रोलमध्ये एकाच दिशेने संकेत जातात. कारण उलट दिशेने येणारे संकेत आवाजात किंवा चित्रात पडलेला फरक इ. ग्रहण करण्याचे काम माणूसच करतो.

चंद्रावर जाऊन केवळ दूरस्थ नियंत्रणाच्या आधारे चंद्रावरची माती पृथ्वीवर परत आणून रशियन यानांनी दूरस्थ नियंत्रणाची मजल कोठवर जाऊ शकते याचाच पुरावा दिला.

❑❑



*To Be Masters in Computers, Contact - I.M.L.D. Jnana Prabodhini, Pune.*

# स्वप्नपूर्तिकडे भरारी

***डॉ. गिरीश बापट***
***संचालक, ज्ञान प्रबोधिनी***

*महाराष्ट्रातील कुमारवाचकांसाठी सर्वांगीण परिपूर्ण असं एखादं मासिक काढावं. ते केवळ मासिक न राहता उपक्रमांचं स्त्रोत बनावं असं स्वप्नं सुमारे वीस वर्षांपूर्वी ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. डॉ. वि.वि.पेंडसे यांनी पाहिलं. त्याला साकार रूप मिळालं 'छात्र प्रबोधन' च्या रूपाने!*

*'छात्र प्रबोधन' ५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्या निमित्ताने छात्र प्रबोधनचे कालचे स्वप्न, आजचे स्वरूप आणि भविष्यातील अपेक्षा याचा आढावा घेत आहेत ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट!*

छात्र प्रबोधनच्या या अंकाच्या मुखपृष्ठावर वर्ष ५ वे अंक १ ला असे लिहिले आहे. परंतु खरे तर मागच्या महिन्यातच छात्र प्रबोधनला पाच वर्षे पूर्ण झाली. पहिले वर्षभर 'प्रबोधन' या नावाने हे मासिक चालू होते. नंतर शासनाकडून 'छात्र प्रबोधन' या नावाला मान्यता मिळाली व तेव्हापासून वर्ष मोजायला सुरुवात झाली. छात्र प्रबोधनची ही पाच वर्षे अनेक प्रयोग करण्यात गेली आहेत. एखाद्या मासिकाच्या रंगरूपामध्ये इतके प्रयोग क्वचितच दिसतात. समर्थ रामदासांनी एका पत्रामध्ये

**''आहे तितुके जतन करावे।**
**पुढे आणिक मिळवावे।''**

असे म्हटले आहे. ह्या दोन्ही गोष्टी वेगळ्या करता येत नाहीत. आहे ते जतन करण्याचे काम तुम्ही करत बसलात तर, आहे त्याची किंमत कमी होत जाते. आहे त्याची किंमत कमी न होता ते जतन करायचे असेल, तर त्यात सतत नवी नवी भर घालावी लागते. नवीन भर घालण्यासाठी नवे प्रयोग करावे लागतात, धाडस करावे लागते, जो सतत प्रयोग करतो त्याच्यावरच भाग्य प्रसन्न होते. गेली दोन वर्षे राज्य पातळीवरचा 'दर्पण पुरस्कार' छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकाला मिळाला, ही ह्या प्रयोगशीलतेची, नवीन श्रेय मिळवल्याची निशाणी! आहे ते जतन केल्याची निशाणी! नवीन नवीन मिळवत राहिल्यानेच, आहे त्याचे जतन होते.

छात्र प्रबोधनसंबंधी विचार करताना मन नेहमी वीस वर्षे मागे जाते. १९७६ च्या दिवाळीपूर्वी फटाके विक्री करून काही युवकांनी स्वकष्टाने पैसे मिळविले. त्या पैशाचा उपयोग करून महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून प्रवास करत वेगवेगळ्या दिशांनी हे सर्व युवक वर्ध्याला पवनार आश्रमात विनाबाजींना भेटायला गेले. त्या दौऱ्यापासून विचार सुरू झाला की महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यात प्रबोधिनी पोहोचली पाहिजे. त्यावेळी अशी कल्पना निघाली होती की एक मासिक असावे. त्या मासिकातून महाराष्ट्रभर पसरलेल्या



कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी 'कल्पक बनू या' अवश्य वाचा ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

प्रबोधकांच्या बुद्धीला सतत काहीतरी खाद्य पुरवावं. फक्त मासिक वाचून सर्व होणार नाही, त्यासाठी कोणीतरी गावोगावी गेले पाहिजे, मासिकात छापलेले प्रबोधकांना समजावून सांगितले पाहिजे, मासिकातले उपक्रम त्यांच्याकडून करून घेतले पाहिजे अशीही कल्पना तेव्हा सुचली होती. प्रबोधिनीचे संस्थापक-संचालक कै.डॉ. आप्पा पेंडसे आणि तेव्हाचे प्रमुख कार्यकर्ते ह्यांच्या अशा चर्चा चालत, त्या मी फक्त बाजूला बसून ऐकलेल्या आहेत.

माझा या कल्पनेशी प्रत्यक्ष संबंध १९८२ साली आला. तेव्हा नुकतेच वर्ड प्रोसेसर हे तंत्रज्ञान वापरात आले होते. वर्ड प्रोसेसर असलेले इलेक्ट्रॉनिक लेखन यंत्र मी अमेरिकेत मिळवावे आणि ते प्रबोधिनीत पाठवावे, अशी कै. आप्पांची पत्रे माझ्याकडे येऊ लागली. माझे तेव्हा शिक्षण चालू होते. फार वेळ काढणे शक्य नव्हते. मी फक्त निरोप्याचे काम करायचो. कै. आप्पाच पुण्यातून पत्र लिहून पाठवत आणि मी ती अमेरिकेतल्या पोस्टात टाकत असे. ज्यांना पत्र पाठवलेली असत त्यांना दूरभाष करून पत्र मिळाले का, हे विचारत असे. निरोप्याचे काम करता करता पत्रव्यवहाराचा विषयदेखील माहीत झाला. वर्ड प्रोसेसरच्या साहाय्याने स्वस्तात, दर्जेदार छपाई करून मागे बोललेली मासिकाची कल्पनाच कै. आप्पा प्रत्यक्षात आणू पाहत होते. माझे शिक्षण संपवून मी भारतात परत आलो. वर्ड प्रोसेसरचे काम अर्धवटच राहिले. परंतु त्या मासिकाची कल्पना मात्र माझ्या मनात पक्की जाऊन बसली.

वर्ड प्रोसेसरच्या निमित्ताने झालेल्या पत्रव्यवहारात असे दिसून आले की कै. आप्पांच्या मनात केवळ महाराष्ट्रभर पसरलेल्या विद्यार्थ्यांसाठीच नाही तर गावोगावच्या साक्षर गावकऱ्यांसाठीही एक नियतकालिक चालवण्याची कल्पना विकसित झालेली होती.

ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर छात्र प्रबोधनचा प्रयोग सुरू झाला. अतिशय वेगाने महाराष्ट्रातल्या २२ जिल्ह्यांमध्ये व महाराष्ट्राबाहेर ८ राज्यांमध्ये छात्र प्रबोधनला सभासद मिळाले. छात्र प्रबोधनच्या शिबिरांसाठी दिल्ली आणि गोव्याहून विद्यार्थी येऊ लागले. अशा प्रकारच्या मासिकाची आवश्यकता पाच वर्षांनंतर अधिक प्रकर्षाने जाणवते आहे.

छात्र प्रबोधनच्या पुढील वाढीचा विचार होतो तेव्हा, कधीतरी सर्व भारतीय भाषांमध्ये छात्र प्रबोधनची आवृत्ती निघाली पाहिजे, असे वाटते. परंतु छापील मासिक ही कल्पना अजून फार तर दहा-पंधरा वर्षे टिकेल. छात्र प्रबोधनची मासिक चित्रफित (व्हीडीओ) आवृत्ती काढावी अशीही एक कल्पना आहे. येत्या दोन-तीन वर्षातच काही अंक तरी ह्या पद्धतीने काढावेत. अशी योजना आहे.

सध्या अनेक वर्तमानपत्रांच्या आवृत्त्या एकाच वेळी अनेक शहरांमधून निघतात. एकेका पानाचा मजकूर संगणक आणि उपग्रहाच्या साहाय्याने सर्व शहरांमध्ये पोहोचविला जातो. गावोगाव फक्त छापण्याचे काम चालते. शाळाशाळांमधून संगणक पोहोचले तर छात्र प्रबोधनही ह्या

पद्धतीने संगणकाद्वारेच पाठविता येईल. छापण्याची आवश्यकताच राहणार नाही. एकेका शाळेतले विद्यार्थी त्यांच्या शाळेतल्या संगणकाच्या पडद्यावरच छात्र प्रबोधनची पाने पाहू शकतील. घरी संगणक आला तर, आपापल्या घरच्या संगणकावर देखील छात्र प्रबोधन वाचू शकतील. ह्या वर्षीच ह्यासाठी लागणारे सर्व तंत्रज्ञान भारतामध्ये वापरले जाऊ लागणार आहे. छात्र प्रबोधनने पुढच्या पाच वर्षात हे तंत्रदेखील वापरायला हवे.

छात्र प्रबोधनच्या प्रकाशनासाठी आधुनिकातले आधुनिक तंत्रज्ञान वापरणे हा एक भाग झाला. आधुनिक तंत्रज्ञान वापरायचे ते मासिक जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे यासाठी. ह्यावर्षी छात्र प्रबोधनची ग्रामीण आवृत्ती निघणार आहे. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या बोली भाषांमध्ये छात्र प्रबोधनची काही पाने तरी छापावीत, अशी कल्पना आहे. मी लहानपणापासून शिकलो आणि घरी बोलतो ती भाषा अशुद्ध आहे. असे कोणालाही वाटता कामा नये.

तंत्रज्ञानाच्या बाबतीत आधुनिकातल्या आधुनिक, भाषेच्या बाबतीत जास्तीतजास्त समावेशक बनण्याचा छात्र प्रबोधनचा प्रयत्न असला पाहिजे, त्याबरोबरच आशयाच्या दृष्टीनेही छात्र प्रबोधन अनेक विषयांनी व रसांनी परिपूर्ण व्हायला पाहिजे. अद्भुत रस आणि हास्य रस छात्र प्रबोधनमध्ये अधिक प्रमाणात असला पाहिजे. शांत रस आणि वीर रसाचा प्रत्ययही छात्र प्रबोधनमध्ये आला पाहिजे. कुतूहल, उत्सुकता, जिज्ञासा वाढविणारे लेखन छात्र प्रबोधनमध्ये यायला पाहिजे. देशोदेशीचे विद्यार्थी कसे हसत-खेळत मोठे होतात किंवा कुठे कष्ट करत आणि जगत एकदम प्रौढ होतात ह्याची माहिती छात्र प्रबोधनच्या सभासदांना मिळाली पाहिजे.

छात्र प्रबोधनच्या यशामुळे प्रबोधिनीमध्ये अनेक नियतकालिकांना प्रयोगिक स्तरावर सुरुवात झाली आहे. अध्यापकांसाठी **'प्रशिक्षक'** हे द्वै-मासिक सुरू झाले आहे. ग्रामीण प्रज्ञा विकास योजनेच्या विद्यार्थ्यांसाठी **'प्रबोधक'** ही मासिक पत्रिका सुरू झाली आहे. प्रबोधिनीच्या आयुर्वेद संशोधिकेतर्फे **'सूक्ष्मौषधी पत्रिका'** हे त्रैमासिक लवकरच सुरु होत आहे. प्रचीती ह्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संघटनेतर्फे **'संवाद'** हे मासिक पत्रक चालते. छात्र प्रबोधनचे ५००० सभासद धरून प्रबोधिनीच्या सर्व औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक उपक्रमांमधून सुमारे १५०० लहान-मोठ्या लोकांपर्यंत प्रबोधिनी पोहोचते. ही संख्या एक लाखाच्या पुढे कशी नेता येईल, असा विचार प्रबोधिनीचे कार्यकर्ते सध्या करत आहे. इतक्या सगळ्या लोकांपर्यंत पोहोचायचे ते, त्यांची बुद्धी आणि शक्ती समाजाभिमुख व्हावी म्हणून. स्वाभिमानी, उद्यमशील आणि समाजाभिमुख व्यक्तीच देशाचे रूप पालटू शकते. छात्र प्रबोधनच्या सर्व सभासदांना छात्र प्रबोधन वाचून असे बनण्याची प्रेरणा व्हावी, ह्यासाठीच छात्र प्रबोधनचा प्रारंभ केला आहे... ❑❑



'प्रज्ञाबोध मालिका' रु. १००/- (NTSपरिक्षेसाठी शालेय प्रवणता कसोटी प्रश्नसंच, इंग्रजी व मराठी माध्यमांमध्ये छात्र प्रबोधन प्रकाशन

## संवाद भारतीय भाषांशी

**चौदा भाषा उठल्या गर्जत!...** हे पद्य आपण ऐकले आहे. त्या भाषांशी ओळख तरी असावी असे आपल्याला वाटत असते. भाषा भिन्न असल्या तरी आपली संस्कृती एक आहे. प्रत्येक भाषेत अतिशय समृद्ध वाङ्मय आहे. आज अनेकवेळा अन्य प्रांतात जाणे आवश्यक ठरते. अशावेळी तेथील माणसांशी किमान संपर्क साधता यायला हवा. याची सुरुवात म्हणून सोप्या प्रसंगांतून कन्नड व बंगाली भाषांची ओळख करून घेऊ या.

**अजित** – ये मित्रा ये, इथे बैस, तुझे नाव काय?
**मनोहर** – माझे नाव मनोहर दत्तात्रय साळगावकर.
**अजित** – तू कोठून आलास? सध्या पुण्यात कोठे राहतोस?
**मनोहर** – मी मुंबईहून आलो व शहराबाहेर चिंचवड या उपनगरात राहतो.
**अजित** – तुझे वडील कोणता व्यवसाय करतात?
**मनोहर** – माझे वडील आर्किटेक्ट आहेत आणि आई दंतवैद्य आहे.
**अजित** – तू १०वी नंतर कोणत्या शिक्षण संस्थेत प्रवेश घेणार?
**मनोहर** – मी १०वी नंतर मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी शासकीय तंत्रनिकेतनात प्रवेश घेणार.
**अजित** – मित्रा, तुला मन:पूर्वक शुभेच्छा ! बरंय पुन्हा भेटू या !

### बंगाली अनुवाद

**अजित** – एरवने एसो, बन्धु एरवाने एसो, एरवने बोसो तोमार नाम की?
**मनोहर** – आमार नाम मनोहर दत्तात्रय साळगावकर.
**अजित** – तुमी कोयतिके एसेचो! एखन वूनाते कोथाय थाको?
**मनोहर** – आत्रि मुंबई तिकी एसेदी, एखन चिंचवड थाकि.
**अजित** – तोमार बाबा की काज करेन?
**मनोहर** – आमार बाबा आर्किटेक्ट, आमार मी दंतवैद्य.
**अजित** – तुई १० क्लास पास करार पर कि विषय निये आगे पडली?
**मनोहर** – आमी १० क्लास पास करार पर मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा कोरबो.
**अजित** – आमार बन्धू, तोर मनकामोना पूर्णा होक एई आमार शुभेच्छा आबार देखा हबे.

### कानडी अनुवाद

**अजित** – बा. मेळेया (मित्रा) बा! इल्ली कुळिनुको; न्नि हेसरेनु?
**मनोहर** – नन्न हेसरु मनोहर दत्तात्रय साळगावकर.
**अजित** – नीनु एल्लिंद बंदिद्दिय ? संघक्के पुणेयल्ली एल्ली डळिदु कोंडिद्दी?
**मनोहर** – नानु मुंबई इंद बंदे मत्तु पट्टणद. होरगे चिंचवड ई उपनगरदलल्ली डळियु कोंडिद्देने.
**अजित** – न्नि तंदे याव व्यवसाय माडुत्तारे ?
**मनोहर** – नन्नु आर्किटेक्ट मत्तु तन्नत ताई हलिन्न वैधरागिद्दारे.
**अजित** – नीनु हत्तने तरगतीय नंतर याव शिक्षण संस्थेयल्ली प्रवेश तेगेदु कोळु वे?
**मनोहर** – नानु हत्तने तरगायित नंतर मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा अभ्यास क्कागी शासकीय तंत्रनिकेतन दल्ली प्रवेश तेगेदु काळ्ळे.
**अजित** – गेलेया (मित्रा) निको मन:पूर्वक शुभेच्छे. ओळेदु मत्तोम्मे भेटी यागुवा.



ललित लेखनाची कृतिपुस्तिका 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' आवर्जून संग्रही ठेवा ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

# दिवाळी अंकासाठी...... विविध स्पर्धा

## तुम्ही व्हा लेखक

प्रबोधक मित्रांनो,

शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट म्हणून तुम्ही निबंध लिहिता, मुद्यावरून गोष्ट लिहिता. अनेक शाळातून तुम्हीच लिहिलेले हस्तलिखित मासिक तयार केले जाते. 'तुम्हाला संपादक व्हा' असे आवाहन करून छात्र प्रबोधनने एकदा हस्तलिखित अंक स्पर्धा जाहीर केली होती, आठवतंय ना! तुमच्यापैकी काही जणांनी त्या स्पर्धेत पारितोषिके मिळविली असतील. तुम्ही 'कथा लेखक व्हावे' यासाठी स्पर्धा जाहीर करीत आहोत.

| गट क्र. | पात्र | घटना | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | म्हातारा | मृत्यू | युद्धभूमी |
| २ | बालक | भूकंप | मंदिर |
| ३ | मुख्याध्यापक | चळवळ | शाळा |
| ४ | चोर | महापूर | हॉस्पिटल |
| ५ | आजी | चक्रीवादळ | जत्रा |
| ६ | परदेशी प्रवासी | निवडणूक | लोकल |
| ७ | पाटील | अपघात | शेत |
| ८ | गरुड | शिकार | वाळवंट |
| ९ | लेखक | संमेलन | सभागृह |
| १० | ऋषी | यज्ञ | अरण्य |

कुठल्याही कथेसाठी चार बाबींची आवश्यकता असते. त्या गोष्टी म्हणजे **वेळ, पात्र, घटना, स्थळ.** या स्पर्धेत दिवाळी ही वेळ निश्चित आहे. पुढे दिलेल्या बाबींच्या दहापैकी कुठल्याही एका गटाची निवड करा. त्यावर तुम्ही ५०० ते ७०० शब्दापर्यंत छोटीशी कथा लिहून पाठवा.

## गुप्त संदेश स्पर्धा

या स्पर्धेत तुम्हाला एक संदेश स्वरचित कवितेतून गुप्तपणे तुमच्या मित्र किंवा मैत्रिणीला पाठवायचा आहे. पुढे दिलेल्या संदेशातील एकेक अक्षर कवितेच्या एका ओळीत क्रमाने येईल. अशा प्रकारची अर्थपूर्ण कविता तयार करा. संदेशाची अक्षरे आपल्या कवितेमध्ये वेगवेगळ्या क्रमाने गुंफण्याची कोणतीही कल्पना वापरा. उदा. प्रत्येक ओळीचे पहिले किंवा शेवटचे अक्षर घेतले तर संदेश तयार होईल किंवा पहिल्या ओळीतील पहिले, दुसऱ्यातील दुसरे, इ.

### संदेश ''शुभ दिपावली''

## जाहिरात लेखन

खालील वस्तूंची १५० शब्दांमध्ये आकर्षक रूपात, छपाईस देण्यायोग्य जाहिरात लिहायची आहे.

विषय :
१) शुद्ध हवा
२) शुद्ध भाषा
३) पूर्णपणे स्वदेशी उत्पादने
४) भ्रष्टाचाराविरहित वसाहत

***वरील सर्व स्पर्धांमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी आपले साहित्य ५ सप्टेंबर १९९६ पूर्वी मासिकाच्या मुख्य कार्यालयाकडे पाठवावे. प्रत्येक स्पर्धेतील पहिल्या तीन यशस्वी स्पर्धकांना आकर्षक पारितोषिके!***



गाणं म्हणत जगण्यासाठी अन् फुलासारखं फुलण्यासाठी हवं छात्र प्रबोधन हाती.

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध परिक्षेला बसायचे आहे ना?

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (N.C.E.R.T) दिल्ली यांच्या वतीने ही परीक्षा घेण्यात येते. राज्य स्तर व राष्ट्रीय स्तर अशा दोन स्तरांवर ही परीक्षा घेतली जाते. इ. १० वी मध्ये शिकत असणारे नियमित विद्यार्थी/विद्यार्थिनी या परीक्षेला बसू शकतात.

**आवेदन पत्र –** मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे प्रत्येकी रु. २/- किंमतीला आवेदन पत्रे मिळतील. ती पूर्ण भरून आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत यांच्याकडे पाठवायची असतात.

**राज्यस्तरीय परीक्षा यावर्षी २४ नोव्हेंबर, १९९६ रविवार या दिवशी आहे. आवेदन पत्र भरण्याचा अंतिम दिनांक ३० ऑगस्ट ९६ आहे.**

## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

**निगडी** : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ८४३८०
**सोलापूर** : ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर. ☎ २५७८२
सातारा : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२७/१ अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ, सातारा. ☎ ५०५०४.
**सांगली** : **श्री. शैलेंद्र केळकर,** ६९२ गावभाग खाडिलकर गल्ली, सांगली ☎ ७७३८२
**कोल्हापूर** : डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर ☎ २१५३४
**इचलकरंजी** : **श्री. विनायक गद्रे,** वॉर्ड नं. ५, घर नं. ६८ अ, ढेंबे चौक, इचलकरंजी. ☎ ४२४००८
**नाशिक** : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता, नाशिक. ☎ ५७४८३०
**ठाणे** : डॉ. अजित दातार, बी-२० अहिल्या सोसा. घंटाळी रस्ता, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**डोंबिवली** : **सौ.ज्योती औटी,** ३-श्री बिल्डिंग, टिळकनगर शाळेजवळ, डोंबिवली (पू.) ☎ ४७४६८८
**रत्नागिरी** : सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद, रत्नागिरी ☎ २०७२४
**धुळे** : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे.
**चाळीसगाव** : श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक, गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव.
**परभणी** : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर परभणी किंवा बाल विद्यामंदीर, परभणी.
**लातूर** : श्री. अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर ☎ ४२६१४
**औरंगाबाद** : सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद - ३.

या कार्यालयामध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधन द्वारा आयोजित विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती येथे मिळेल व त्याची नावनोंदणी येथे करता येईल.

**या व्यतिरिक्त मुंबई, अहमदनगर, जालना, जळगाव, रायगड, सिंधुदुर्ग, बीड, उस्मानाबाद या ठिकाणी छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये सुरू करावयाची आहेत. इच्छुकांनी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.**

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून ८ श्रावण शके १९१८, ३० जुलै १९९६ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.

ॐ

॥ अविद्यया मृत्युं तीर्त्वा, विद्ययाऽमृतमश्नुते ॥

## शिक्षण

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे - १९६९
२. कृषि तांत्रिक विद्यालय, खेड शिवापूर - १९८१
३. ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी - १९८२
४. ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, सोलापूर - १९८९
५. ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे - १९९१
६. शिशुअध्यापक महाविद्यालय, सोलापूर - १९९१
७. शैक्षणिक उपक्रम प्रशिक्षण व संशोधन केंद्र - १९९२
८. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र - १९९४

## ग्रामविकास

१. शिवगंगा खोरे विकास योजना - १९६५
२. गोमसंयंत्र योजना - १९८५
३. पाणलोट क्षेत्र विकास योजना - १९९०
४. स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र - १९९३
५. शिवगंगा महिला उद्योग - १९९४

## संघटन

१. युवक विभाग - १९६२
२. युवती विभाग - १९६४
३. महाविद्यालयातील संघटन 'प्रचीती' - १९९०
४. छात्र प्रबोधन मासिक - १९९२
५. ग्रामीण प्रज्ञा विकास योजना - १९९३

ज्ञान प्रबोधिनी

रूप पालटू देशाचे

१९६२ ते १९९६

## प्रशिक्षण व उत्पादन

१. कोटिभास्कर स्मृति उद्योग, शिवापूर - १९६७
२. क्षणमाप विभाग, पुणे - १९७४
३. उद्‌वाहक विभाग, पुणे - १९८१
४. मुद्रण विभाग, पुणे - १९८१
५. व्यवस्थापन व नेतृत्वविकसन विभाग - १९८४
६. सोल्डरिंग स्कूल, पुणे - १९८५

( विभागांच्या नावापुढील वर्ष विभागाचे प्रारंभवर्ष आहे. )

## संशोधन

१. संस्कृत संस्कृति संशोधिका - १९७५
२. आयुर्वेद औषधी संशोधिका - १९७६
३. प्रज्ञा मानस संशोधिका - १९७८
४. ग्रामीण तंत्रज्ञान संशोधिका (संकल्पित)

## आरोग्य

१. ग्रामीण सर्वंकष आरोग्य योजना - १९८२
२. संजीवन रुग्णालय, पुणे - १९९३

॥ हे स्फुरण येथुनि दशदिशांतराला जावो ॥

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन - PNCW / ३४९, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

## आज प्रचीती द्या !

गिरिकुहरातिल गर्द वनातिल सिंहाच्या छाव्यांनो,
तिमिरपुरातील कृष्णघनातिल तेजस्वी ताऱ्यांनो,
प्रलयंकर शक्तीची तुमच्या आज प्रचीती द्या
तुमच्या शुभकर सामर्थ्याची आज प्रचीती द्या ॥ध्रु.॥

मूक मनांच्या कारागारी धुमसत जी चिनगारी
वीज होउनी कोसळु द्या ती उद्धत अन्यारी
त्या भस्मातुन बहरुन येइल हिरवा स्वर्ग उद्या ॥१॥

शतकांपूर्वीची जयगीते अजुनि घुमत कानी
शतकांपूर्वी अखिल धरेला क्षेम दिले आम्ही
ते खळखळो पौरुष फिरुनी नसांत वाहू द्या ॥२॥

पवित्र मूर्ती प्रिय आईची दुभंग परि झाली
अमित संपदा अतुल वैभवे कुटिलांनी लुटली
गतकालाचे विषाद गौरव भविष्य घडवू द्या ॥३॥

सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमात्र येथे
सर्वार्थांनी रत्नवन्त हो क्षेत्रक्षेत्र येथे
या भूमीला सृजनांची नभपंखी स्वप्ने द्या ॥४॥

समर्पणाची हाक जयांच्या हृदयाला कळली
अजिंक्य झाले राष्ट्र तयांचे अभेद्य बलशाली
सार्थकतेच्या परिसाने त्या जीवन उजळू द्या ॥५॥

संपर्क पत्ता :
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎ ४७७६९१
कार्यालयाची वेळ : स. १० ते संध्या. ७
या अंकाची किंमत - रु. ८/-
वार्षिक वर्गणी : रुपये १००/-
प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर १ श्रावण, शके १९१८
२३ जुलै, १९९६